# शिवस्फूर्ती

# वाचन कट्टा

दिवाळी ई- विशेषांक २०१९



संपादक


आशुतोष सुनिल राहाणे पाटील.

शिवस्फूर्ती

# वाचन कट्टा

**असाध्य ते साध्य करिती सायास | कारण अभ्यास तुका म्हणे ||**

# आला दीपावली चा सण



आला दीपावली चा सण, चला सारवूया अंगण,
अंगणी काढू या रांगोळी, माथी लावूया चंदन

आला दीपावलीचा सण, बनवा चिवडा शंकरपाळे,
बनवू गोड धोड घरी, बघा आनंदती बाळे

आला दीपावलीचा सण, नविन घेऊया कपडे,
लावू दिवे चोहिकडे, चला फोडु फटाकडे

आला दीपावलीचा सण, सारे झाले घरी जमा,
थोरा मोठ्यांचा आनंद गगनात मावेना



- वैष्णवी सुनिल पाटील.

इयत्ता ८ वी

# संपादकीय...

नमस्कार वाचक मित्रांनो,

दिवाळी सणाचे औचित्य साधून 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चा हा पहिला 'दिवाळी ई-विशेषांक' आपल्या हाती सोपवतांना अत्यंत आनंद होत आहे. दि. १९ फेब्रुवारी २०१९ पासुन औरंगाबाद शहरात अगदी छोट्या स्वरुपात सुरु झालेला 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' हा उपक्रम आज अनेकांना वाचण्याची प्रेरणा देत मोठा होत आहे. शिवस्फूर्ती वाचन कट्ट्यातील तरुणांचा एका वाचकापासुन ते लेखकापर्यंतचा प्रवास म्हणजे हा दिवाळी विशेषांक ! एक वाचक म्हणुन सहभागी झालेले तरुण आज लिहू लागले आहेत, विविध विषयांवर लिहीण्याचा, आपले मत मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि यातच 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चे यश आहे असे मला वाटते. 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' हा तरुणांनी तरुणांसाठी चालवलेला उपक्रम आहे. विविध शाखेत अभ्यास करत असलेले तरुण या समूहात असून एकमेकाचे मत ऐकण्याची आणि त्यावर चर्चा करण्याची संधी याद्वारे सर्वांना उपलब्ध होत आहे. **'एकमेका पुस्तके देऊ । अवघे होऊ बुद्धीवंत ॥'** याप्रमाणे पुस्तकांची देवाण- घेवाणही तरुणांमधे होते.

एक मत सर्वमान्य आहे आणि ते म्हणजे 'ज्याचे वाचन उत्तम तोच व्यक्ती उत्तम बोलु शकतो, आपले मत पुढील व्यक्तीला पटवून देऊ शकतो' आणि 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' मार्फत आमचा तोच प्रयत्न आहे की अधिकाधिक तरुणांनी वाचतं व्हावं, बोलतं व्हावं. **'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने'** हे तुकोबारायांचे विचार मानून त्या वाटेवर चालणारे शिवस्फूर्ती वाचन कट्ट्यातील सभासद आहेत. **'ज्ञान हेच साधन आणि ज्ञान हेच साध्य'** याप्रमाणे ज्ञान हे सर्वश्रेष्ठ असुन ज्ञानी व्यक्ती आपले ध्येय निश्चीत गाठू शकतो हे आम्हाला कळून चुकले आहे आणि म्हणूनच 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' च्या माध्यमातुन सर्व सदस्य आपापल्या क्षेत्रात उत्तम कार्य करत आहेत. शिवस्फूर्ती वाचन कट्ट्याची झालेली सुरुवात हा एक योगायोगच म्हणावा लागेल. पुण्यात सौ. शैलजा मोळक, श्री. प्रज्ञेश मोळक यांचेतर्फे आयोजीत वाचन कट्ट्यामधे मी सहभागी झाल्यानंतर मला ही कल्पना सुचली आणि औरंगाबाद शहरात हा उपक्रम सुरु झाला.

वाचन कट्ट्यातील मुलांच्या लिखाणाला वाचक मिळावा आणि त्यांनी आणखी जोमाने लिहायला लागावं याच साठी हा दिवाळी अंकाचा अट्टाहास. २०१९ चा हा शिवस्फूर्ती वाचन कट्टा चा पहिला दिवाळी अंक असून फक्त ऑनलाईन म्हणजे ई स्वरुपात हा अंक उपलब्ध करीत आहोत. दिवाळी अंकाचे लेखक फक्त १९ ते २२ वर्षामधील तरुण असून अजून लिखाणात नवे असल्याने काही दोष लिखाणात आढळु शकतात. विद्यार्थ्यांनी पाठवलेले लिखाण हे जसेच्या तसे प्रकाशित केलेले असून त्यात बदल करण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांच्या चुका त्यांना कळाव्या आणि आपले लिखाण लोकांना आवडते का ? या प्रश्नाचे उत्तर वाचकांनीच त्यांना द्यावं या हेतुने कुठलाही बदल केलेला नाही. विद्यार्थ्यांकडुनच शक्य तेवढ्या व्याकरणाच्या असलेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न केलेला आहे. अजुनही त्यात काही दुरुस्त्या असतीलच, त्याबद्दलची चुक आम्ही मान्य करत आहोत. तरी आपण सुजाण वाचक आम्हा तरुणांच्या या प्रयत्नाला वाव देत या चूकीला पोटात घ्याल ही माफक अपेक्षा. पुढील वेळी यात नक्कीच सुधार होईल असा मी शब्द देतो. **'आपल्या धडावर आपले डोके'** आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत आपणही या उपक्रमात आम्हाला सहभागी व्हा असं मी आवाहन करतो. या दिवाळी अंकाच्या शेवटी आपल्याला फॉर्म ची लिंक दिलेली आहे तो फॉर्म भरुन आपण 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चे सदस्य होऊ शकता.

हा अंक सर्व वाचकांसाठी **अगदी मोफत** आम्ही उपलब्ध करत आहोत. ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ च्या अधिकृत संकेतस्थळावर अंक डाउनलोडींग साठी उपलब्ध असेल. दिपावली सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर केलेले लिखाण आम्ही वाचकांसमोर सादर करीत आहोत आपण त्याचे स्वागत कराल अशी अपेक्षा.

तुकाराम महाराजांच्या विचाराने प्रेरित होऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना वाटेवर आणण्याचा प्रयत्न आम्ही सदैव करत राहू. शेवटी सर्व तरुण मित्रांना एकच सांगणे **‘असाध्य ते साध्य करिती सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥’ म्हणुन अभ्यास करत राहा, वाचत राहा, लिहित राहा.....**

**‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ तर्फे आपणा सर्वांना दिपावलीच्या खुप खुप शुभेच्छा !**



**आपला नम्र**

**संपादक**

**आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**

# अंतरंग


- आला दीपावली चा सण (कविता)
  - वैष्णवी सुनिल पाटील.
- अभेद्य दुर्ग- देवगिरी
  - शुभम पाटील.
- नेमकी कशी द्यावी.. (गजल)
  - अजय त्रिभुवन
- दु:ख असे हे (कविता)
  - शैलेश राउत
- दिन दिन दिवाळी
  - आकाश शिंदे
- कसा मिळणार सांगा (गजल)
  - अजय त्रिभुवन
- प्लास्टीक, प्लास्टीक, प्लास्टीक
  - अविनाश मगर
- कसे वागायचे डोळे (गजल)
  - शैलेश राउत
- भविष्याचे चित्रण दाखवणारा- 'Children of Men'
  - संदेश डोळसे
- अघोषित आणीबाणी (कविता)
  - उमेश इंगळे
- 'शाहीरमहर्षी' आत्माराम पाटील.
  - शुभम केंद्रे
- वाटते आहे खरोखर (गजल)
  - अजय त्रिभुवन
- तुका केवढा केवढा...
  - सुप्रिया जाधव
- आठवण (कविता)
  - शैलेश राउत
- इंटरनेट आणि सोशल मिडीया
  - राजीव पवार
- आता विश्वास राहिला नाही (कविता)
  - उमेश इंगळे
- हळवी गजल- ममता सपकाळ
  - शैलेश राउत
- कवि लिहू लागतो तेव्हा.. (कविता)
  - उमेश इंगळे
- आमचे तरुण...
  - आशुतोष पाटील

# लेखकांचा परिचय....



**आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**
नाणी संग्राहक, लेखक, इतिहास अभ्यासक असुन 'पश्चिमी क्षत्रपांची नाणी' आणि 'स्वराज्याचे चलन' या पुस्तकाचे लेखक आहे. या दिवाळी अंकाचे संपादक असून 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चे अध्यक्ष आहेत. देवगिरी महाविद्यालयात बी ए द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहेत.
संपर्क- 8698825074/ 8669019748
ई- मेल- Ashutoshp1010@gmail.com



**शैलेश. भा. राउत.**
शिक्षण M.sc. B.ed झालेले असून विविध विषयांवर वाचन व कविता तसेच गजल लेखनाची आवड आहे. वाचनाची संस्कृती तरुणांमधे रुजवण्यासाठी या 'शिव्स्फूर्ती वाचन कट्टा' तर्फे प्रयत्नशील आहे.
संपर्क- 9511926867



**संदेश हनुमंत डोळसे**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. चित्रपट हा आवडीचा व पुढे जाऊन आयुष्याचा एक भाग होणार असल्यामूळे या विषयावर लिखाण करण्याचा प्रयत्न करत आहे.
संपर्क- 9370574946



**शुभम सुभाष पाटील.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. इतिहास विषयाची आवड असून विविध गड किल्ल्यांवर अभ्यास करत आहेत तसेच दुर्ग संवर्धनाचा ध्यास घेतललेला आहे.
संपर्क- 8411056842



**आकाश शिंदे.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असून विज्ञान, तंत्रज्ञान जाणण्याची आणि पुस्तके वानाची आवड आहे.

संपर्क- 9325886323



**सुप्रिया सुभाष जाधव.**

संत साहित्य, इतिहास विषयावर वाचनाची आवड.

संपर्क- 9922500639



**अजय त्रिभुवन.**

तरुण गजलकार असुन विविध विषयांवर वाचनांची आवड.

संपर्क- 7507035880



**उमेश विष्णु इंगळे.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असून विविध विचारवंतांचे साहित्य वाचनाची आवड आहे.

संपर्क- 9075732938



**अविनाश मगर.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे असून वाचन, फोटोग्राफी तसे फिरण्याची आवड आहे.

संपर्क- 942392462



**राजीव पवार.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे असून नाटक आणि पुस्तके वाचण्याची आवड आहे.

संपर्क- 7888171725



**शुभम मोतीराम केंद्रे.**

BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे असुन वाचन, गायन आणि वादनाची आवड आहे.

संपर्क- 7775016703

# शिवस्फूर्ती वाचन कट्टा



## दिवाळी ई- विशेषांक २०१९

(वर्ष पहिले)

**संपादक**

## आशुतोष सुनिल राहाणे पाटील.

सहकार्य- सर्व कार्यकारणी व सदस्य शिवस्फूर्ती वाचन कट्टा, औरंगाबाद.

अक्षरजुळवणी, मुखपृष्ठ व आतील सजावट- आशुतोष सुनिल राहाणे पाटील.

**'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चा 'दिवाळी विशेषांक २०१९' हा फक्त 'ई- अंक' प्रकाशित केलेला असुन तो वाचकांसाठी मोफत उपलब्ध केलेला आहे. 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' च्या संकेतस्थळावर हा अंक डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध असेल. या अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

# शिवस्फूर्ती वाचन कट्टा च्या ‘दिवाळी ई- विशेषांकास’ जेष्ठ साहित्यीक मा. श्री. बाबा भांड यांच्या शुभेच्छा !

शिवस्फुर्ती वाचन कट्टा
ई-विशेषांकाची भन्नाट कल्पना,
त्याची कलात्मक मांडणी आणि
लेखनातील वैविध्याबद्दल सर्वांचे
हार्दिक अभिनंदन!
दिवाळीनंतर भेटू या.


बाबा भांड
२६/१०/२०१९

## समृद्ध व अभेद्य दुर्ग

# देवगिरी



इतिहासात समृद्धी व अभेद्यपणामूळे प्रसिद्ध असलेल्या किल्ले देवगिरी ची निर्मीती भिल्लम पाचवा या यादव घराण्याच्या राजाने बाराव्या शतकात केली. तत्पूर्वी यादव घराणे हे चालुक्यांचे मांडलिक म्हणुन राहत होते. भिल्लम राजाने इ.स. ११८७ मध्ये चालूक्यांचा अंमल झुगारुन स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. यादवांची परंपरागत राजधानी असलेली सिन्नर (श्रीनगर) नगरी बदलून भिल्लमाने किल्ले देवगिरी (देवांचा पर्वत) वर वसवली. त्या काळी देवगिरीत देशभरातून व्यापारी व्यापारासाठी येत अशा प्रकारे ऐश्वर्य व धनसंपन्न ने नांदत असलेली यादवांची राजधानी म्हणून देवगिरी ची ख्याती पसरली. इ.स. ११८७ ते १२८७ या शंभर वर्षाच्या काळात देवगिरी वर यादवांनी स्वातंत्र्य उपभोगले व राज्य केले. पण त्यानंतर मात्र यादव राज्याला उतरती कळा आली. त्याचे कारण म्हणजे इतिहासात प्रसिद्ध असलेली अल्लाउद्दीन खिलजीची यादव राजा रामदेवराय याच्या वरील इ.स. १२९६ मध्ये झालेली 'देवगिरीवरील स्वारी'.



या स्वारीत राजा रामदेवराय हा त्याला शरण जाऊन तह करुन अमाप संपत्ती देतो. फेरिश्ता या इतिहासकराच्या 'तारीखे फरिश्ता' या ग्रंथात तहातील संपत्तीची मोजदाद सांगितली आहे. त्यानुसार रामदेवरायाने अल्लाउद्दीनला दिलेली संपत्ती अशी सहाशे मन सोने, सात मन मोती, दोन मन लाल याकूत, अलमास आणि जमरुत व हिरे तसेच एक हजार मन चांदी, चार हजार वार रेशीम वस्त्र. यानंतर पुन्हा अल्लाउद्दीनचा विश्वासू सेनापती मलिक कफूर हा देवगिरी वर स्वारी करुन रामदेवरायाचा पराभव करत त्याचा मुलगा शंकरदेवाला ठार मारतो. कफूर हरपाळदेव या रामदेवरायाच्या जावयाला देवगिरीच्या गादीवर बसवून अमाप संपत्ती घेऊन दिल्ली ला गेला. त्यानंतर हरपाळदेव आपले स्वातंत्र्य पुकारतो व शेवटी इ.स. १३१८ मध्ये देवगिरीच्या चौथ्या स्वारीत सुलतान मुबारकशाह खिलजी हा त्यास ठार मारतो. अशा प्रकारे खिलजींच्या चौथा स्वारीत यादव राज्य व देवगिरीदुर्ग वरील यादवांची सत्ता संपुष्टात येते व खिलजींचा अंमल बसतो. खिलजीच्य काळात जगप्रसिद्ध शायर व सुफी कवी अमीर खुस्रो हा देवगिरीत असताना इथल्या ऐश्वर्य व सुंदरता मुळे तो खूप प्रभावीत झाला. खिलजीनंतर दिल्लीच्या तक्तावर तुघलक घराणे सत्तेवर आले. तुघलक घराण्यातील सुलतान मुहम्मद तुघलक याने तर इ.स. १३२७ मध्ये आपली राजधानी दिल्लीहून थेट देवगिरी येथे आणली. इथे आबाद (अमाप) असलेल्या दौलत (संपत्ती) मूळे त्याने देवगिरीचे नामांतर "दौलताबाद" असे केले. इब्न बतुता हा प्रवासी मुहम्मद तुघलक सोबत दौलताबादला आला असता त्याने त्याच्या 'सफरनामा' या ग्रंथात अनेक उल्लेख केले आहे. अल्लाउद्दीन हसन गंगू याच्या नेतृत्वात इ.स. १३४७ मध्ये दौलताबाद मध्ये स्वतंत्र बहामनी राज्याची स्थापना होते. पण पुढे बहामनीची राजधानी दौलताबाद हुन दुर गुलबर्गा ला नेण्यात येते. बहामनी राज्याच्या विघटन नंतर अहमदनगरच्या निजामशाहीत दौलताबादचा समावेश होतो. निजामशाहीच्या काळात गडाचे किल्लेदार व महान संत जनार्दन स्वामी हे होऊन गेले संत एकनाथ महाराज हे त्यांचेच शिष्य, अशा थोर संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा देवगिरी दुर्ग. याप्रमाणेच मोमीन आरिफ व हजरत शाहनूर दौलताबादी हे महान सुफी संत ही याच काळात होऊन गेले. जेव्हा अहमदनगर मुघल सम्राट अकबराच्या ताब्यात येते तेव्हा मलिक अंबर हा निजामशाहीचा कर्तृत्ववान वजीर इ.स.१६०७ मध्ये सुरक्षेच्या दृष्टीकोनातून राजधानीचे स्थलांतर दौलताबादला करुन सुलतान मुर्तजा ला सुरक्षीत ठेवले. याच काळात किल्ल्यात बाल जिजाऊ व शहाजी यांचे लग्न दौलताबाद मध्ये थाटात झाले होते. अनेक वर्षे मुघल सम्राट जहांगीर व शहाजहान यांनी निजामशाही



बुडविण्यासाठी दौलताबाद वर चाल केली पण मलिक अंबर व मराठा सरदारांच्या पराक्रमा मूळे त्यांना यश आले नाही. शेवटी इ.स. १६३३ मध्ये चार महिन्यांच्या वेढ्यानंतर बादशहा शहाजहान हा दौलताबाद किल्याचा ताबा घेतो. इ.स. १७२४ नंतर तो हैदराबादच्या निजाम घराण्याकडे अंमलाखाली येतो. पुढे इ.स. १७६० मध्ये उदगीरला झालेल्या युद्धात मराठे निजामाचा पराभव करुन तहाद्वारे दौलताबाद किल्ला ताब्यात घेतात. पण दोन वर्षांच्या अल्प काळानंतर लगेच इ.स. १७६२ ला दौलताबाद पुन्हा निजामाच्या अधिकारात येतो व अनेक वर्षे निजाम संस्थानच्या ताब्यातच राहतो. सरते शेवटी इ.स. १९४८ सप्टेंबर मध्ये झालेल्या 'मराठवाडा मुक्ति संग्रामात' प्रदीर्घ इतिहास लाभलेला हा दुर्ग निजाम संस्थानातुन भारतीय सरकार मध्ये विलीन होतो.




इतिहासाचा आपण मागोवा घेतल्यानंतर आता आपण देवगिरी दुर्गाची बांधणी कोणत्या शासन काळात कधी झाली याची सखोल माहिती घेऊया. देवगिरीचा मुख्य बाले किल्ला ज्या त्रिकोणी आकाराच्या टेकडीवर आहे त्याची ऊंची २०० मीटर आहे. दुर्गाच्या टेकडीचा दगड हा काळ्या पाषाणाचा (Basalt rock) आहे. राजा भिल्लम ने जेव्हा या नविन राजधानीचे निर्माण कार्य सुरु केले तेव्हाच्या कल्पक अभियंतांनी दुर्गाला अभेद्य करण्यासाठी प्रामुख्याने दोन योजना केल्याचे दिसते. पहिल्या योजनेत टेकडीचे कडे चारही बाजुने अशा प्रकारे तासुन गुळगुळीत केले की माणुस तर दुर पण कुठलाही सरपटणारा प्राणी वर चढुन जाऊ शकत नाही. तसेच त्या कड्यांच्या भोवती चारही बाजूने काळ्या खडकात कोरुन तयार केलेला खंदक असून त्याची रुंदी १६ मीटर व खोली २० मीटर आहे. अशा या अवघड खंदकाला पार करण्यासाठी यादव काळापासून जनावरांच्या कातडीचा पूल हा एकमेव मार्ग होता. सध्याच्या स्थिती मध्ये खंदक पार करण्यासाठी दोन पूल

आहे. खालचा पूल हा निजाम हैदराबादच्या काळात बांधण्यात आला होता तर वरचा लोखंडी पूल हा इ.स. १९५२ साली भारतीय सरकार तर्फे बांधण्यात आला. दुसर्या योजनेत 'अंधेरी भूलभूलैया' किंवा 'मोठअंधेरी' ची रचना करण्यात आली. प्रामुख्याने खडकात कोरण्यात आलेला हा अंधेरी गुहांचा समुह आहे. या गुहांच्या समुहात खडकात गोल आकारात अश्या वाटा तयार करण्यात आल्या की जर शत्रू सैनिक यात शिरला तर तो मृत्यूच्या तोंडात जाई. पायर्यांच्या वर चढलो की एका आडव्या लोखंडी झाकनातून जे एक प्रकारचे प्रवेशद्वारच आहे यातुन वाट वर येते. पुढील वाट आज असलेल्या बारादरी परिसराकडे जाते जिथे यादव काळात खडकात पाण्याच्या टाक्या कोरण्यात आल्या. मोती व कवडी अश्या दोन पाण्याच्या टाक्या असून यातील मोती टाक्याची साठवणुक क्षमता २० x ६० x ८ फूट आहे तर कवडी टाक्याची २० x ३० फुट आहे. तसेच सुरक्षा यंत्रनेत भर म्हणुन टेकडीच्या पायथ्यालाच यादव काळात चौकोनी आकाराची 'कालकोट' तटबंदी बांधण्यात आली होती तटबंदीत बुरुज व मोठा असा कालकोट दरवाजाचा समावेश आहे. वरील सर्व योजना ही यादवकाली असून या काळात देवगिरी दुर्गाचा विस्तार हा आजच्या बारादरी पासुन ते केवळ कालकोट दरवाजा पर्यंत होता. इ.स. १३१८ मध्ये कुतुबुद्दीन मुबारकशाह खिलजी ने देवगिरी दुर्ग जिंकल्यावर पायथ्याच्या नगरातील अनेक इमारती व सुंदर मंदिरे पाडुन त्यांचाच पूणर्वापर करुन दुसऱ्या इमारती व मशिदी बांधण्यासाठी केला. जसे त्याने एक मोठी व सुंदर अशी जामा मशिद बांधली जिचे आकारमान ८७ x ८७ मीटर असून आतील व बाहेरील छोट्या खांबांवर देवी-देवता व जैन तिर्थंकारांचे शिल्प दिसते. पुढे तुघलक कालखंडात मुहम्मद तुघलकाने आपली राजधानी दिल्ली ते देवगिरी ला आणल्यावर किल्ल्याची सुरक्षा व्यवस्था आणखी अभेद्य केली. किल्याच्या पायथ्याशी त्याने 'महाकोट' ही तटबंदी उभारली जी ५ कि.मी. लांब असून याला ५४ छोटे-मोठे बुरुज आहेत. महाकोटाला पार करण्यासाठी सुरुवातीचे ३ मुख्य महाद्वार असून तटबंदीची उंची ६ ते ९ मीटर आणि रुंदी २ ते ३ मीटर आहे. महाकोटात मुहम्मद तुघलकाने खुप वास्तु बांधल्या ज्यात प्रामुख्याने मशिदी,मदरसे,प्रशासकीय, इमारती व शाही हमाम आहेत. यातील शाही हमाम (स्नानगृह) हे बघण्यासारखे आहे दगड आणि चुन्यात उत्कृष्ट व नियोजण पद्धतीने याची बांधणी केली असून. महाकोटाच्या आतील कर्मचारी वर्ग व वस्तीसाठी पाण्याची व्यवस्था म्हणुन तेव्हा 'हत्ती हौद' असा ३८



x ३८ x ६.६ मीटर विशाल आकारमानाचा हौद बांधण्यात आला होता. असा हा विशाल हौद भूमिगत असल्याने आतील बाजुस उत्तम प्रकारचा चुन्याचा गिलावा करण्यात आला होता. याप्रमाणेच किल्ल्याच्या बाहेरील भागात सुद्धा तलावासारखा भासणार्या अशा विशाल 'कतलघ हौद' ची निर्मीती मुहम्मद तुघलकाचा गुरु कुतलग खान यांनी व त्यांचे बंधु मौलाना निझामुद्दीन यांनी केली. हौदाच्या बाजुलाच तुघलकाची 'शिकारगाह' ही दोन मजली वास्तु आहे.

त्यानंतर इ.स.१३४७ मध्ये दक्षिण भारतात तुघलकांचा अंमल झुगारत अल्लाउद्दीन हसन गंगूच्या नेतृत्वात स्वतंत्र अशा 'बहामनी सल्तनत' ची स्थापना दौलताबादच्या किल्ल्यातच होते. बहामनी काळात किल्ल्यात जास्त बदल झाला नाही तरी एक विशेष इमारत रचन्यात आली ती म्हणजे 'चांद मिनार'. कारण दिल्लीतील कुतुब मिनार नंतर देशातील दुसरा उंच मिनार हाच असून याची उंची ७० मीटर आहे. मलिक अंबर या निजामशाहीच्या कर्तृत्व प्रधानाने दौलताबादच्या वस्ती भोवती १४ कि.मी. विशाल व अभेद्य 'अंबरकोट' तटबंदी उभारली होती. अशा या अंबरकोटाच्या तटाची सरासरी उंची ९ ते १२ मीटर असून ४५ बुलं बुरुज व ९ दरवाजे याला आहेत. अश्या या अंबरकोटात मलिक अंबरचा राहता वाडा होता व सध्या स्थितीत शाही हमाम,कडा व शक्कर बावडी आहे. मेंढा तोफेच्या दक्षिणेस याच काळातील एक सुंदर व आयताकृती असलेला 'रंगमहाल' आहे. महालाचा आकारमान २४ x १५ मीटर असून आतील सहा दालन एकमेकांना जोडले आहेत. ही छत ज्या लाकडी खांबावर आधारली होती त्या खांबांवर सुंदर नक्षीकाम कोरले होते. मलिक अंबरने दौलताबादसाठी केलेली सुरक्षा व्यवस्था वरील योजने वरुन स्पष्ट तर होतेच पण तरुण वाचकांना हेही स्पष्ट झाले असेलच की यादव ते निजामशाहीच्या काळात कशा



प्रकारे किल्याचा विस्तार झाला व बदल होते गेले. जेव्हा मुघल सम्राट शहाजहानने दौलताबाद जिंकल्यावर त्याच्या किल्ल्यातील तीन महिन्यांच्या मुक्कामात काही सुंदर वास्तुंची उभारणी केली. जसे सर्वोच्च माथ्यावरील बारादरी,औरंगजेब महाल जो आज पूर्णतः उद्धवस्त झाला आहे व शाही हमाम. यापैकी बारादरी ही संपूर्ण चुन्याने गिलावा केलेली पांढरी अष्टकोनी इमारत विशेष उल्लेखणीय व मुघल स्थापत्यकलेचे आकर्षण आहे. महालाच्या बारा कमानी मुळे याला बारादरी म्हटले जाते. बारादरी नंतर मेंढा तोफ जवळच 'चिनी महाल' हा सुंदर महाल आलमगीर औरंगजेबाने बांधला. या दोन मजली महालाचे आकारमान ५ x ५.८० x १० मीटर आहे. याला चिनी महाल यासाठी म्हटले जाते कारण याच्या सजावटीत चीन देशातुन मागवलेल्या निळ्या व पिवळ्या रंगाच्या टाईल्सचा वापर करण्यात आला होता. औरंगजेबाने याच महालात छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी महाराणी येसूबाईसाहेब व युवराज शाहूराजे,आदिलशहाचा सुलतान सिकंदर व कुतुबशाहीचा सुलतान अबुलहसन तानाशाह. या सर्व तोफांमध्ये प्रामुख्याने 'मेंढा' व 'दुर्गा' या सर्वात मोठ्या तोफा आहेत. यातील मेंढा तोफ ही १६.३० मीटर व्यासाच्या गोलाकार बुरुजाच्या मध्यभागी बसवली असून सर्व दिशेला ३६० अंशात फिरवता येत होती. तोफेच्या मागच्या टोकाला मेंढीच्या तोंडाचा आकार व चेहर्याचे नक्षीकाम केल्याने याला मेंढा तोफ असे नाव पडले. मेंढा तोफे नंतर दुसरी मोठी तोफ म्हणजे  सर्वोच्च माथ्या वरील 'दुर्गा तोफ' जी एका मोठ्या चौकोनी बुरुजाच्या चौकोनी ओट्यावर बसवली आहे. अशी ही पितळी तोफ ५.८० मीटर लांब आहे. तोफेच्या मागच्या टोका जवळ देवनागरी लिपीत 'श्री दुर्गे' असे कोरले असून यावरुन या तोफेचे नाव दुर्गा तोफ असे पडले.  इ.स.



१७६० मध्ये तहाद्वारे दौलताबाद मराठ्यांच्या ताब्यात येतो तेव्हा पेशवा नानासाहेब यांच्या आदेशानुसार त्यांच्या एका सरदाराने बालेकिल्ल्यावर श्री गणेश मंदिराची स्थापना केली. मंदिराच्या गाभार्यात गणपती बाप्पाची अखंड मूर्ती विराजमान असून मंदिराचे कळस हे तीन तोफगोळे एकमेकांवर रचुन तयार करण्यात आले आहे. दोन वर्षांच्या अल्प काळानंतर इ.स. १७६२ ते १९४८ पर्यंत दौलताबाद हा निजाम संस्थानच्या ताब्यात होता आणि या दरम्यान किल्ल्यात काही विशेष बदल किंवा बांधकाम केल्याचे आढळत नाही. सप्टेंबर १९४८ मध्ये दौलताबाद हैद्राबाद संस्थान मधुन भारत सरकारच्या ताब्यात आला. तेव्हा तत्कालीन काँग्रेस नेत्यांनी कुतुबुद्दीन मुबारक शाह खिलजीने बांधलेल्या जामा मशिद मध्ये 'भारत माता' च्या भव्य मूर्तीची स्थापना केली. अशा या किल्ले देवगिरी-दौलताबादचा यादव राजवट पासुन ते निजाम हैद्राबाद च्या राजवट पर्यंतचा प्रदिर्घ इतिहास असून तो अभेद्य बनला व आजही इतिहासाची साक्ष देत ताठ मानेने उभा आहे.

**- शुभम सुभाष पाटील.**



# गजल

नेमकी द्यावी कशी मी मात लोकांना
आपल्या नुसत्या चुका दिसतात लोकांना

मी बदलल्या सारखा अजिबात नाही पण
का तरी दिसतो बदल माझ्यात लोकांना

सर्व सांगावे सविस्तर लागते त्यांना
कळत नाही मोजक्या शब्दात लोकांना

वेळही केव्हातरी येते अशी काही
दाखवावी लागते औकात लोकांना

ठेवली हृदयात जागा मी तयांसाठी
जायचे असते तरी... डोक्यात लोकांना

**- अजय त्रिभुवन**





# दिन दिन दिवाळी

दिवाळी म्हटलं की  दिवे आठवतात फटाक्याचा कडकडाट आठवतो. फराळाचे विविध प्रकार आठवतात, मामाचे गाव आठवते, मामाच्या गावी जाण्यासाठी रेल्वेतून केलेला प्रवास आठवतो, घरी आलेल्या पाहुण्यांसोबत घालवलेले क्षण आठवतात. विविध प्रकारातील मातीने बनवलेले शिवाजी महाराजांचे किल्ले आठवतात, पूजेच्या अगोदर केलेला फराळ आणि नातेवाईकांकडून आशीर्वाद स्वरूपात मिळालेले पैसे आठवतात. मामाच्या मुलांबरोबर दिवाळीत केलेली धमाल आठवते मामाने घेतलेले नवीन कपडे घालुन स्वाभिमानाने मिरवलेले क्षण आठवतात. ही सर्व आठवण बालपणाची आहे. बालपणी केलेली ही प्रचंड धमाल सतत मनातील घरात वावरते पण आज कालचे प्रचंड दगदगीचे दिवस पाहता ‘ते बालपण आपण परत जगु शकत नाही का ?’ हा प्रश्न देखील पुढे येतो. मन जरी ते बालपण जगण्याचे चितंन करीत असले तरी ‘ते शक्य नाही’ हा आवाज आधुनिक दिवाळीचे चित्र पाहताच कानी पडतो आणि चित्राचे चिंतन स्वरूपातच विलीनीकरण होते.



एकदा आठवा ती दिवाळी सुर्याच्या संथ प्रकाशात सकाळ झालेली असायची, लग्न झालेली आपली बहिण दिवाळीला घरी आल्यावर आनंदाने आपल्या अंगावर सुगंधित उटण्याचा स्पर्श करीत होती. मस्ती

करत आनंदाने थंडगार अंगाला केलेल्या उटण्याचा स्पर्ष अंगावर शहारे आणायचा आणि उटण्याच्या सुगंधाने मन एकदम तृप्त व्हायचे. बाजारातील नवीन साबणाने अंघोळ करायची आणि पूर्ण वर्षभर दिवाळीसाठी राखुन ठेवलेल्या सुगंधित तेलाने डोक्याची मालिश करता करता गप्पा मारायच्या. फराळाचा सुगंध नाकावर पडताच एकदम स्वयंपाक घरात जाऊन आईने व ताईने केलेला चिवडा चकल्या आणि गुलाब जामुन यांचा स्वाद घेत त्यांचे त्यासाठी तोंड भरुन कौतुक करायचे.

मामाने घेतलेल्या नविन कपड्यांचा रुबाब दाखवत फटाके फोडण्यासाठी मैदानावर नाही तर अगदी गावाच्या पारावर जायचे. बाजारातून विकत आणलेले नवीन स्वरूपाचे फटाके अगदी भीत भीत फोडायचे आणि ते व्यवस्थितरित्या फुटले की चार जणांना सांगत सुटायचे. रात्री आकाशात दिसणारा रॉकेट, जमीनीवर गोल फिरणारे चक्र आणि फुलझाड असा विविध फटाक्यांचा आनंद घ्यायचा. आईबरोबर सायंकाळी रांगोळी काढताना विविध प्रश्नांची चर्चा करायची आणि रांगोळी काढण्यासाठी सल्ला द्यायचा. रांगोळीच्या मधोमध पणती ठेवत ती पणती सुरसुरीने लावण्याची जिद्द मनात असायची आणि दिवाळीची ही मजा पहायची. पण आज हि दिवाळी केवळ आठवणीतच राहिली आहे.

पूर्वीसारखा स्वयंपाक घरात तयार होणारा फराळ व त्यांचा घरभर पसरणारा सुगंध राहिलाच नाही. आज लोक कामाच्या व्यापामुळे  दुकानातून किंवा बाजारातून घरात आणतात आणि तो करताना किंवा खाताना घरातील मुले देखील हट्ट करताना दिसत नाहीत कारण देखील सोशल मीडियावर ती शुभेच्छा देण्यात आणि इतर गोष्टीत व्यस्त दिसतात. आज शहरातील तरुण मुलं फराळ म्हणून पिझ्झा- बर्गर हे पदार्थ खाताना दिसतात. फटाक्यांचा आवाज कानात अजून ऐकू येतो पण केवळ दहा वर्षाखालील मुलेच फटाके फोडतांना दिसतात. आकाश कंदील तर सर्व बाजारातील रेडिमेड दिसतात, घरात लहान मुलांनी एकत्र येऊन बनवलेला आकाशकंदील आज दिसणे अवघड झाले आहे.



हल्ली तर मामाच्या गावाकडे जाण्याची खरी मजाच राहिलेली नाही, मामा कपडे तर घेतो पण ते स्वाभिमानाने घालून आता आम्ही मिरवत नाही. ताई घरी येते भाऊबीज दिवशी ओवाळते आणि आपल्याला खायला

घातलेला तो फराळ  हा घरचा नसून तो बाजारातला आहे याची खंत पण तेव्हा नक्कीच जाणवते. घरी तयार केलेले उटणे तर आज फक्त भुतकाळात राहिले आहे कारण बाजारात विकले जाणारे केमिकल युक्त उटणे आता आम्हाला जास्त सुगंधित वाटू लागले आहेत. किल्ले बनवण्याची प्रथा ही तर जवळपास बंद झाली आहे कुठे क्वचित दिसलेच तर बालपण जिवंत असल्याचे जाणवते. रांगोळीचे देखिल आता रेडीमेड छाप्याने पडलेल्या शिक्क्यात रुपांतर झाले आहे.

दुरावा वाढल्यामुळे नात्यातील एकतेचा ऱ्हास होत चाललेला आहे म्हणून दिवाळीत येणाऱ्या नातेवाईकांची संख्या कमी होत जात आहे. जवळपास दिवाळी म्हटले की कामापासून मिळालेला आराम, सुट्टीचे दिवस, शाळेच्या अभ्यासक्रमातून मिळालेला विराम, दुसर्या शहरातून जाऊन पिकनिक साजरी करण्याचे क्षण, दिवाळी म्हणजे नवीन खरेदी करण्यासाठी मिळालेला वेळ हा समजला जात आहे. आमच्या दिवाळीचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत चालले आहे, आमचे बालपण हरवत चालले आहे. आपल्या कित्येक परंपरा या जशा भुतकाळात जमा झाल्या तसे याचे होऊ नये असे वाटते. शेवटी दिपावलीच्या शुभेच्छा देत एवढेच बोलावेसे वाटते,

**" दियों की रोशनी से मिलाता आंगन हो**

**पटाखों की गूंज से आसमान रोशन हो**

**ऐसी आयें झुमके यह दिवाली**

**हर तरफ खुशियों का मौसम हो "**

- आकाश पांडुरंग शिंदे.

# दुःख असे हे...

रडावं वाटलं तर, रडता येत नाही
एक दुःख असे हे सरता सरत नाही..

स्मृतींचे थवे येतात मनावर असे
आभाळ मनाचे काळवंडत राहते
अन दुःख ठिपका होऊन जाता
निखळाव म्हटलं तर निखळता येत नाही..

तळ ठोकून ओक्साबोक्शी
विव्हळत राहते एक वेदना
मनाच्या उंबऱ्यावर अविरत
अन चुकता ठोका काळजाचा
सावरावं म्हटलं तर सावरता येत नाही..

- शैलेश. भा. राउत.

# प्लास्टिक... प्लास्टिक... प्लास्टिक...

जगातील पहिले प्लास्टिक 1866 च्या सुमारास पूर्व लंडनमध्ये हॅकणे येथे Alexander Parks यांनी तयार केले. तेव्हाचे प्लास्टिक हे 'पार्किसन' या नावाने ओळखले जात होते. पार्क यांनी त्यांचे तंत्रज्ञान एका रेनकोट कंपनीला विकले आणि त्यांना बराच पैसाही मिळाला होता.

बिलियर्ड्स चेंडू साठी पूर्वी महागडे हस्तिदंत वापरले जात, त्याला पर्याय शोधणाऱ्यांस बक्षीसही जाहीर करण्यात आले होते तेव्हा अमेरिकन संशोधक जॉन वेसली यांनी हे आव्हान यशस्वीपणे पेलले त्यांनी आधुनिक प्लास्टिकची निर्मिती त्यासाठी केली. सिंथेटिक सेलूलाईट तो प्रकार होता यातूनच पुढे नायट्रोसेल्युलोज सेलू लाईट ,सेल्युलोज फेनोलिक, अमायनो, प्लास्टिक ,नायलॉन असे नाना प्रकार पुढे आले. इ.स. 1950 मधे झिग्लर व नाटा यांना Polymerisation प्रक्रियेसाठी नोबेल मिळाल. त्यानंतर प्लास्टिकचे व्यावसायीकरण वेगाने सुरु झाले व तिथूनच प्लास्टिकचा वापर हा पॅकेजिंगसाठी करण्यात आला..



प्लास्टिकचा वापर ही एक माणसाची मानसिक गुलामगिरी झाली आणि ती तोडणे सहज शक्य आहे पण त्यासाठी निश्चयपूर्वक प्रयत्न करावे लागतील. कारण प्लास्टिक हे काही बायोडिग्रेडेबल नाही आणि सर्वकाही प्लास्टिक हे पुन्हा वापरात आणता येत नाही ( सगळेच प्लास्टिक रिसायकल होतं हा आपला गैरसमज आहे) भारतातील फारच थोड्या प्लास्टिकचा पुनर्वापर करता येतो त्यामुळे बहुतांश वेळा प्लास्टिक हा कचऱ्याचा ठरतो हा प्लास्टिक कचरा कधीच नष्ट होत नाही कारण त्याचे विघटन होत नाही तांत्रिकदृष्ट्या सगळ्याच वस्तूची रिसायकलिंग करता येते पण त्याला काही मर्यादा आहेत. बराच प्लास्टिक कचरा रिसायकल न करताच तो जाळला जातो.

परिणामी त्यानंतरही उरलेल्या बऱ्याच प्लास्टिकचे अंतिम स्थाने महासागर असते पण प्लास्टिक हे महासागरात अनेक सूक्ष्म तुकड्यांच्या स्वरूपात जाते आणि मासे या प्लास्टिकला आपले भक्ष्य समजुन खातात. सध्या यात काही योजना आखल्या नाहीत तर पुढे यातुन खुप मोठी समस्या उभी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकाच वेळी वापरून फेकून देण्याच्या प्लास्टिकची समस्या खूप मोठी आहे (Use and throw). आपण सवयीने त्यांचे गुलाम झालो आहोत. प्लास्टिकच्या पातळ पिशव्यांना दैनंदिन वापरात स्थान आहे त्याचबरोबर विविध कार्यक्रमात वापरण्यात येणारे पाण्याचे ग्लास, प्लास्टिक स्ट्रॉ, पाण्याच्या बाटल्या याचा वापर त्यात जास्त आहे. या प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर कमी करा. फेरविचार करा. शक्य तेवढे प्लास्टिक वापरायला नकार द्या. याबाबत विविध उपाययोजना आखुन कशा प्रकारे प्लास्टिक चा वापर कमी करता येइल याचा विचार करा, आपण प्लास्टिक न वापरण्याबद्दल चा निश्चय करा प्लास्टिक हे एक व्यसन आहे...



**- अविनाश मगर**

# ग़ज़ल

कसा मिळणार सांगा मी तुम्हाला जो हवा आहे
इथे मी मैफिलीमध्ये अजुन थोडा नवा आहे

तुला बिलगून दाहकता कमी माझ्यातली होते
प्रिये तुझिया मिठीमध्ये खरोखर गारवा आहे

जरा जमिनीवरी द्या आपटुन समजेल मग त्याला
आता सध्यातरी डोक्यामधे त्याच्या हवा आहे

कसे फसला तुम्हीही एवढ्या साध्याच गोष्टीला
तुम्ही ज्याला समजला सूर्य तो तर काजवा आहे

किती ती खूश झालेली तिला सांगीतले कोणी
तिचा हा जन्म माझ्या सोबतीने सातवा आहे

**- अजय त्रिभुवन**



# गजल

कसे वागायचे डोळे
खरे बोलायचे डोळे..

गुलाबी व्हायची ती अन
किती लाजायचे डोळे..

मनाला झोप नाही या
जरी लागायचे डोळे..

तिच्यावर जायची दृष्टी
खुळे मग व्हायचे डोळे..

जुनी पाने पलटताना
नको वाटायचे डोळे..

- शैलेश. भा. राउत.



भविष्याचा अंदाज बांधणारा

# ‘Children of Men’

भारत आणि सिनेमा यांचे नाते शब्दांत व्यक्त करणे अवघड आहे. सिनेमा (मग तो कोणताही असो) त्याला भारतीय प्रेक्षकांचा कमी-अधिक प्रमाणात प्रतिसाद मिळतो. कधीकधी काही चित्रपटांमधे विषय नसूनही केवळ नावाजलेल्या अभिनेते किंवा अभिनेत्री मुळे डोक्यावर घेतले जातात तर कधी-कधी आपल्याला पूर्णपणे हलवून सोडणारे, विचार करायला भाग पाडणारे आणि अस्तित्वाची किंवा सत्याची जाणीव करुन देणाऱ्या सिनेमांना दुर्लक्षित केले जाते. पण हेच काळाच्या पुढचे सिनेमे पुढच्या येणाऱ्या काळात जगाला हलवून सोडणार असतात. अशा सिनेमांची खरी ओळख पटवून देण्याचे काम एका खऱ्या चित्रपट समीक्षकाचे असतं. आज प्रेक्षकांना चित्रपट आणि सिनेमातला फरक कळणे गरजेचे आहे असे मला वाटते.

भारत हा जगातील क्रमांक दोनचा सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश (तात्पुरता तरी!), आपल्या लोकसंख्येमुळे आपला देश प्रसिद्ध आहे. पण समजा भविष्यात अपत्यप्राप्ती ही प्रक्रिया जर लोप पावली तर ? किंवा "कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट" ही गोष्ट जर लोकसंख्येला लागू झाली तर ? हाहाकार माजेल आणि वेगळेच प्रश्न समस्या निर्माण होतील. या लेखात आपण अशाच एका चित्रपटाबद्दल जाणणार आहोत जो या समस्येवर भाष्य करतो.

'Children of Men' (2006) हा दिग्दर्शक अल्फोंसो कोहेरोन (Alfonso Cuaron) दिग्दर्शित चित्रपट भविष्याच एक वास्तविक चित्रण दाखवण्याचा प्रयत्न करतो. 2027 सालाचं चित्रण करणारा हा





चित्रपट 'अपत्यप्राप्तीची समस्या' या मध्यवर्ती कल्पनेला घेऊन त्या भोवती फिरतो. १८ वर्षापासून वंध्यत्व (infertility) ने त्रस्त असणाऱ्या पृथ्वीवरील सर्व जनतेला जेव्हा जगातील सर्वात तरुण अशा मुलाचे निधन झाले असे कळते तेव्हा सगळीकडे अराजकता माजते. जगातील काही मोजकेच कार्यरत असलेल्या सरकारांपैकी एक उरलेल्या इंग्लंडमध्ये देखील याचे पडसाद उमटतात. Theo Faron या एकेकाळी कार्यकर्ता राहिलेल्या पण आता इंग्लंडमधील सरकारी कार्यालयातील कर्मचारी असणाऱ्या व्यक्तीला हे पडसाद जाणवतात.

Theo चं इंग्लंडमधल्या निर्वासितांच्या ग्रुप ची नेता व Theo ची भूतपूर्व पत्नी Jaylor अपहरण करते. आपल्या जवळच्या Kee (की) या निर्वासित महिलेच्या स्थलांतरासाठी लागणारी कागदपत्रे मिळवून देण्याची विनंती ती Theo ला करते. आपल्या नातेवाईक अधिकाऱ्याच्या मार्फत ते कागदपत्र Theo मिळवतो. Luke या group च्या सदस्यांसोबत हे सगळे सेंटरबरी (Canterbury) या ठिकाणी स्थलांतर करत असताना वाटेत झालेल्या हल्ल्यात Julian चा मृत्यू होतो.

Canterbury ला आल्यावर Theo ला Kee चे रहस्य कळते. Julian ज्या संघटनेसाठी काम करत असते त्या संघटनेतील सदस्यांचे खरे हेतु कळल्यावर मात्र Theo हा Kee आणि Miriam या डॉक्टरला घेऊन पलायन करतो आणि Jasper Palmer या आपल्या मित्राकडे वास्तव्याला जातो. हिप्पी संस्कृतीला मानणारा Jasper हा त्यांना स्थलांतरासाठी मदत करतो आणि सरतेशेवटी Theo हा Kee ला घेऊन पलायन करण्यात यशस्वी होतो.



‘Children of Men’ हा दिग्दर्शक ‘Alfenso Cuaron’ यांचा सर्वात जास्त नावाजलेल्या चित्रपटांपैकी एक. भविष्याचे उगाचच रंजक चित्रण न करता समाजाचे भयाण वास्तव दाखवण्याचा प्रयत्न या चित्रपटात केला आहे. या चित्रपटातील काही दृश्ये तुम्हाला हलवून सोडतात. खास करून ‘Long Shot’ हा चित्रपट दिग्दर्शनाचा प्रकार जर तुम्हाला बघायचा किंवा समजून घ्यायचा असेल तर हा चित्रपट बघावांच. खास करून ‘Car Ambush’ चा 4 Minute 7 Seconds चा ‘Long Shot’ तुम्हाला कायमस्वरूपी लक्षात राहतो. दिग्दर्शकांनी ज्या पद्धतीने या चित्रपटाचं चित्रीकरण केले आहे ते वाखाणण्याजोगे आहे. या चित्रपटाचे 5 वैशिष्ट्य आहेत की ज्यामुळे हा चित्रपट लक्षात राहतो.




1) चित्रपटाचा विषय

2) चित्रपटाच्या कथानकातील वास्तविकता

3) चित्रपटातील पार्श्वसंगीत

4) चित्रपटाचे संगीत

5) चित्रपटाची सिनेमॅटोग्राफी

जागतिक दर्जाच्या चित्रपटांचे स्वतःचे एक वैशिष्ट्य असते आणि ‘Children of Men’ चे वैशिष्ट्य हे की या चित्रपटाचा मुळ नायकच मुळात निराशावादी, अलिप्त व अस्वस्थ दाखवला आहे. एकीकडे जगात आशावादी दृष्टिकोन दिसताना नायक मात्र निराशावादी दिसतो. ज्या पद्धतीने चित्रपटाची सुरुवात होते ती पूर्णपणे अनपेक्षित व आश्चर्यकारक आहेच पण सिनेमा जगतातील सर्वात आशावादी शेवटांपैकी एक शेवट या चित्रपटाचा आहे. या चित्रपटाचा शेवट बघताना तुम्हाला एक आशावादी,आश्चर्यकारक व करूणेने भरलेले चित्र दिसते आणि तुमचे मन हेलावून सोडण्यात हे दृश्य खरेच यशस्वी होते. डोनाल्ड ट्रम्प चे निर्वासितांविरोधी धोरण, ब्रेक्झिट करारातून इंग्लंडची माघार, दहशतवाद, धर्मांधता व गरिबी या वर्तमानातील घडामोडी आणि चित्रपटातील 2027 साल चे समाजाचे चित्रण यात तुम्हाला साम्य दिसुन येते हे या चित्रपटाचे मुख्य वैशिष्ट आहे.

चित्रपटात मायकल अँजेलो पासून ते पाब्लो पिकासो पर्यंत सर्वांच्या प्रतिकृतीचे दर्शन होते. एवढेच काय Jasper च्या तोंडून 'शांती- शांती- शांती' हे भारतीय उपनिषदातील शब्द आपल्याला ऐकायला भेटतात. 2027 सालाचं चित्रण दाखवलेल्या या चित्रपटातील कोणतेच दृश्य अतिशोक्ती वाटत नाही. या चित्रपटातील निर्वासितांचे चित्रण आजच्या जागतिक घडामोडींना तंतोतंत लागू होते.



चित्रपटातील शेवटचे थरारक दृश्य चित्रित करण्यासाठी संपूर्ण चित्रपटाच्या टीमला तब्बल दोन आठवडे लागले. चित्रपटातील शेवटच्या दृश्यात तुम्हाला कॅमेऱ्याच्या Lens वरं रक्त उडालेले दिसते. Visual Effect असं जरी आपल्याला त्या दृश्य विषयी वाटत असलं तरी ते त्या दृश्याच्या चित्रीकरणावेळी चुकून उडालेले होते. पण तरीही Alfenso यांनी चित्रीकरण सुरू ठेवले. पण याच दृश्यांमुळे चित्रपटातील त्या थरार दृश्याला जिवंतपणा आला. 'Children of Men' हा चित्रपट सर्वोत्कृष्ट असला तरी चित्रपटाची मूळ संकल्पना (Infertility) ही आजच्या काळात तरी वास्तववादी नाही, पण ती भविष्याचा आरसा दाखवण्यात मात्र कुठेच कमी पडत नाही.

या काळाच्या पुढच्या चित्रपटाला मात्र दुर्दैवाने प्रेक्षकांनी पाठ फिरवली. 76 मिलियन डॉलरचे बजेट असणाऱ्या या चित्रपटाला जेमतेम 70 मिलियन डॉलर्स कमावता आले. आज मात्र या चित्रपटाची दूरदृष्टी लोकांना कळून चुकली आहे. BBC या जगप्रसिद्ध संकेतस्थळाने या चित्रपटाला '21 व्या शतकातील सर्वोत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत 13 वे स्थान दिले आहे' तब्बल 11 वर्षा अगोदर येऊन सुद्धा आजच्या जागतिक घडामोडींचे यथार्थ वर्णन करणारा हा चित्रपट चित्रपट रसिक व समीक्षकांसाठी एक पर्वणीच आहे.

**- संदेश हनुमंत डोळसे**






# अघोषित आणीबाणी

कह दो उन्हे, हम जिंदा है अभी
हम लढना सिख रहे है
इस अघोषित आणीबाणी में.....

कह दो उन्हे, हम मरे नही हैं
संविधान बचा रहा है हमे
इस अघोषित आणीबाणी में.....

काट दो जूँबा हमारी, चाहे मार भी दो
फिर भी कलमें लिख रही खिलाफ तुम्हारे
इस अघोषित आणीबाणी में.....

आवाज बंद कर दी जाती हैं, सवाल पूछने से
फिर भी आवाज लगा रहे है हम
इस अघोषित आणीबाणी में.....

रात बडी काली हैं साहब यहां की
हम मशालें लेकर चल रहे है
इस अघोषित आणीबाणी में.....

- उमेश विष्णुलक्ष्मी इंगळे.


शाहिरी परंपरेतील उर्ध्वयू

# शाहीरमहर्षी आत्माराम पाटील



शाहीरमहर्षी आत्माराम पाटील हिंदवी राष्ट्राचं एक उत्तुंग आणि मनस्वी व्यक्तीमत्व. प्रतिभाशाली सारस्वत, प्रज्ञावंत आणि विचारवंत ह्यांचा सुंदर संगम शाहिरांच्या ठायी झालेला आहे. शाहीर आणि माणूस यांचं अभिन्नत्व हीच त्यांची खरी ओळख आहे .

पालघर तालुक्याच्या दक्षिण टोकावर वसलेलं इतिहास प्रसिद्ध दातिवरे हे शाहीर आत्माराम पाटील यांच्या पूर्वजांचं गाव . पण शाहीरांचा जन्म आणि बालपण हे माकने - कपाशे या गावात गेलं . यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९२४ रोजी झाला . लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे संस्कारही तसेच मिळत गेले आणि पुढे ते शाहिरी गाऊ लागले.



शाहीरमहर्षीबद्दल लिहित असतांना किंवा त्यांची शाहिरी अभ्यासताना त्यामागे असलेला खरा माणूस डोकावताना दिसतो आणि त्यांच्यातील "माणूस" जाणून घेतांना त्यांची शाहिरी डोळ्यासमोर उभी राहते. शाहीरांच्या काव्याची मुख्य प्रेरणा ही स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय प्रबोधनाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसोबत सर्व महापुरुषांचा त्यांना आदर होता तसेच स्वतंत्र लोकशाही , समता, बंधूता या जीवनमूल्यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यांच्या पोवाडे, स्फूर्ती गीतं, कवन, लावण्या व डफगाण्यात वरील सर्व विषयांचा विविध प्रकारे आपल्याला प्रत्यय येतो.

**संयुक्त महाराष्ट्र उगवतो माझ्या सरकारा ।**

**खुशाल कोंबडं झाकून धरा ।।**

हे शाहीरांचे गीत त्या काळी खूप गाजलं . शाहीरांची लेखणी सतत लोकआंदोलने आणि राष्ट्रीय आपत्तीतून स्फूर्ती घेऊन

तलवारीच्या पातीसारखी तळपत राहिली हे ह्या गीतातून दिसून येते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीर अमर शेख , शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर द.ना.गव्हाणकर, शाहीर लीलाधर हेगडे इ. अनेक शाहीरांच्या सोबत शाहीरमहर्षी आत्माराम पाटील यांचे देखील नाव घ्यावे लागेल. ह्यांच्या शाहिरी लेखणीने उभ्या महाराष्ट्रात चैतन्य निर्माण करून मराठी मनाला जागं करण्याचं इतिहासकार्य काम शाहीरांनी केलं आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या व मराठी भाषेच्या विकासासाठी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली पाहिजे असे कळकळीने सांगणाऱ्या शाहीर पाटलांना मराठी भाषेच्या भवितव्याची काळजी लागून राहिलेली दिसते. "मराठी भालगंध" असलेला 'महाराष्ट्र' शब्द शिल्लक राहील का ? याची चिंता वाटणाऱ्या शाहीराला मराठी भाषेचा डौल हळूहळू नाहीसा व्हायला लागलेला दिसतो आणि ती चिंता तो खालील ओळीत वर्णन करतो...

**जसा शयाचा किडा ।**

**खातो काळजाच्या कडा ।**

**तशा मराठीच्या कडा ।**

**खाल्ल्या विचार करा ।।**



मराठी भाषेची काळजी जर वेळीच घेतली नाही तर -

**आज केला नाही उपाय ।**

**लागला हळुहळु सुकाया ।**

**शेवटी रगत लागुन ओकाय ।**

**जाल सोनापुरा ।।**

असा तो 'लाखाची बात' या लावणीत ईशारा देतो. राज्यकर्त्यांच्या निश्चित भाषिक धोरणाच्या अभावामुळे आणि सामाजिक- सांस्कृतिक परिस्थितीच्या दबावाखाली मराठी माणसाला इंग्रजीच्या आश्रयाला आज जावे लागत आहे. पण तीस - पस्तीस वर्षापूर्वी लिहिलेल्या 'मिसळ' या गाण्यात शाहीर आत्माराम पाटील यांनी इंग्रजीच्या आक्रमक प्रभावामुळे मराठी भाषेची झालेली अवस्था मार्मिकपणे शब्दबध्द केली आहे.

**मराठी भाषेची झालिया मिसळ ।**

**कर्ता कर्म सारं इंग्रजी दिसंल ।**


**क्रियापदापुरती मराठी असंल ।।**

त्यानंतर शेतकरी व कामगार हे दोन्ही देशाचे हात आहेत, यांच्या बद्दल शाहीरांना आस्था व जिव्हाळा आहे त्याचसोबत आदिवासींबद्दल देखील जिव्हाळा व प्रेम शाहीर आत्माराम पाटील यांना होता. एकेकाळी 'जंगलचे राजं'असलेल्या या भूमीपुत्रांच्या जीवनाची झालेली परवड झालेले शोषण या मुद्यांना दृष्टिक्षेपात शाहीर वर्णन करतात व आदिवासींचे आणून देतात.

**आम्ही जंगलचं राजं वनवासी ।**

**आम्ही चांद सुर्यापासनं आदिवासी ।।**

शाहीरमहर्षी आत्माराम पाटील यांच्या काव्यात त्यांचे देशप्रेम विविधप्रकारे व्यक्त झाले आहे. आपला देश कसा आहे ? तो कसा असावा ?, देशाचा युवक व विद्यार्थी कसा असावा ? असे विविध उदाहरणे शाहीर आपले शाहिरी काव्य 'असावा - नसावा' मधून मांडतात ते मी खालील ओळीत वर्णन करतो अगदी नेमक्या शब्दात –



**माझा हिंदुस्थान । लोकशाहीवान । जगात बलवान। असावा ।**

**राहु आहे चीन । केतु पाकिस्तान । सूर्य हिंदुस्तान । असावा ।।**

**देशाची किर्ती । वाढवील धरती । असा विद्यार्थी । असावा ।**

**मार्गात थापडी । वर्गात लफडी । परिक्षेत उपडी । नसावा ।।**

**कॉलेज कुमार । ज्ञानाचा मिनार । विश्व चिंतणार । असावा ।**

**चूकवून लेक्चर। मैनांत मिक्चर। बघणा पिच्चर । नसावा ।।**

**म्हणे आत्माराम । देशाचा पैगाम । सज्ज सरंजाम ।असावा ।**

**देशाचा गाभारा । असाच उभारा । दुष्मनांना थारा । नसावा ।।**

यासोबत भावी पिढीच्या भविष्याच्या काळजीने घेरला गेलेला हा शाहीर 'शाळकरी बाळांनो' या गीतात आपल्याला भेटतो . तो त्यात मुलांना धर्म , जात , वर्ण यांच्या संसर्गापासून दूर राहायला सांगतो.

**देशाच्या पाण्यानं ।देशाच्या दाण्यानं । राष्ट्रीय बाण्यानं । जगायचं हाय । तुम्हा जगायचं हाय।**

**नव जग तुम्हा निर्माण करायचं हाय ।।**

**देशाच्या पाण्यानं ।देशाच्या दाण्यानं । राष्ट्रीय बाण्यानं । जगायचं हाय । तुम्हा जगायचं हाय।**

**नव जग तुम्हा निर्माण करायचं हाय ।।**

बालकांना एक प्रकारची प्रेरणा या गीतातून शाहीर देऊन जातात .आपला देश बलवान व्हावा त्याचा अभिमान वाटावा, संपूर्ण जगात त्याचे नावलौकिक व्हावे ही तळमळ शाहीरांच्या कवनातून दिसून येते .

देशासमोर असणाऱ्या महत्त्वाच्या समस्यांपैकी एक समस्या म्हणजे धर्म - जात व त्यातील रूढी व परंपरा यांच्याशी निगडित आहे, आजच्या विज्ञानयुगात धर्म व जात यांच्या अभिमानाचा काय उपयोग आहे ? याविषयी शाहीर म्हणतात...

**सोडा धर्म जाती रण । करा देश बलवान ।**

**या जातीभेदानं माझा देश मरतो ।**

**सारं स्वार्थाचं कारणं । लावती धर्माचं तोरणं ।**

**चाले अधर्माच रन साऱ्या जगावरती ।।**

अशा रोखठोख शब्दांत शाहीर आपल्या देशबांधवांना विचार करायला लावतात. 'ज्ञातिविसर्जना' च्या लावणीत शाहीर आत्माराम पाटील यांनी अठरापगड जातींनी भरलेल्या महाराष्ट्रातील नव्वदाहून अधिक जातींची एकत्र केलेली गुंफण लक्षीणीय तर आहेच, पण सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीनेही ती उपयुक्त होऊ शकेल अशी आशा आहे. आपला देश 'भूतखाना' बनला आहे अशी खंत शाहीर व्यक्त करतात तर नुसतं खंत व्यक्त करून थांबत नाहीत तर यावर फटक्याच्या रुपात भूतखाना हे काव्य लिहितात...

**भाविकपणा उरला नाही । बुद्धीवाद मुरला नाही ।**

**पुंजीवाद गेला नाही । समाजवाद आला नाही ।।**

**कच्चा नाही पक्का नाही अर्धवटपणा ।।**

**सावधान...! सावधान हिंदुस्तान झाला भूतखाना ।।**

**काश्मिरात हिरवे भूत । नक्षलबारीत लाल भूत ।**

**नागामधे गोरे भूत । कळघमचे काळे भूत।**

**ऐक संघी भारताचा बहुरंगी (?) बाणा ।। सावधान ।।**

त्याच प्रमाणे शेवटाकडे जाताना शाहीर आपल्या भारतमातेच्या विषयी आपली असलेली कृतज्ञता व आदर आणि या लोकशाहीचे असलेले आम्ही सर्व प्रजाजन लोकराजे याची दिव्यता पटवून देऊन सांगतात...

**प्रिय आई विश्वाच्या मंगलधामी तुज वंदीत नंदन आम्ही । आम्ही शाहीर मावळी ।।**

**तुझ्या इतिहास पंक्ती । वायने विरांची कोटी ।**

**कटि, कंठी करी लल्हाटी । साज शृंगाराची दाटी ।**

**दिव्य रत्ने झळाळती प्रकाशते देशभक्ती ।**

**गळसरी तू ओविली । शहिदांची मोती पवळी ।**

**त्या तेजे पावन झाली ही धूळ तुझ्या पाऊली ।।**

अश्या सरळ, साध्या पण समर्पक व अर्थपूर्ण शब्दात आणि शाहिरी काव्याच्या अंगभूत ढंगाने शाहीरमहर्षी आत्माराम पाटील यांचे पोवाडे, कवन, स्फूर्तिगीत, लावण्या व डफगाणी नटलेली आहेत व ही शाहिरी आपल्याला आपल्या कर्तव्यांची जाणीव करून देत आहे. शाहिरांच्या काव्य निर्मितीमागील हेतु व त्यांच्या काव्यातील आशय लक्षात घेतला की एक गोष्ट निश्चितपणे जाणवते आणि ती म्हणजे त्यांची असलेली सामाजिक - सांस्कृतिक प्रबोधनकारकाची साकारलेली शाहिरी भूमिका...

हाच शाहिरीचा ध्यास घेऊन शाहिरीच्या संगोपन - संवर्धन आणि प्रशिक्षणार्थ शाहीरमहर्षी आत्माराम पाटील शाहिरी मंच, औरंगाबाद हा मंच शाहिरीचे काम नऊ वर्षापासून महाराष्ट्रात काम करत आहे. या मंचाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ज्येष्ठ शाहीर अंबादास तावरे हे शाहीरमहर्षी आत्माराम पाटील यांच्या विचारांचा ध्यास घेऊन माझ्यासारखा नवा शाहीर निर्माण करण्याचे काम महाराष्ट्रात करत आहेत .

आणि हाच वसा आमचे मार्गदर्शक शाहीर अजिंक्य लिंगायत हे मंचाच्या व लोककला प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून करत आहे. हा लेख लिहिण्याइतपत मी मोठा नाही पण शाहीरमहर्षी मांडण्यासाठी यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आणि त्यामुळेच मी हा लेख लिहू शकलो . जाता जाता एवढेच म्हणणे आहे , शाहीरमहर्षी म्हटल्याप्रमाणे –



**अखंड गुण गायनी जाहला जरी माझा अंत ।**

**पुन्हा जन्मुनी गात मरावे महाराष्ट्र गीत ।।**

**- शुभम मोतीराम केंद्रे**

# गजल

वाटते आहे खरोखर... चूक झाली
प्रेम केले मी तुझ्यावर... चूक झाली

वाटली होती मजा आधी मलाही
पण समजले हेच नंतर... चूक झाली

द्यायची आहेच शिक्षा दे मला तू
वाटते माझी तुला जर... चूक झाली

तू किती देतोस रे नुसती सफाई
एकदा हे मान्यही कर... चूक झाली

एवढा डोक्यावरी बसला कसा तू
मी तुझा केलाय आदर... चूक झाली

संगतीने घात केला यार माझा
राहिलो त्यांच्याबरोबर... चूक झाली

जर मिळाला वेळ तर नक्की सुधारू
म्हणत राहू फक्त तोवर... चूक झाली

**- अजय त्रिभुवन**



## तुका केवढा केवढा

# तुका आकाशाएवढा...

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीला आता पर्यंत जवळपास साडेतीन शतके होऊन गेली. साडेतीन शतकापूर्वी तुकोबांरायांनी जीवन, संसार, सांप्रदाय यावर अचूकपणे मार्गदर्शन केले होते परंतु कालांतराने आपल्याला या गोष्टींचा विसर पडत गेला आणि संत तुकोबारायांनी सांगितल्याप्रमाणे देव हा देवघरात नाही तर माणसात आहे या गोष्टी चा विसर आपल्याला पडला आणि आपण सगळ्यांनी त्यांच्या अभंगांचा आणि ओव्याचा अर्थ जीवनातला त्याचा उपयोग समजून न घेता तो फक्त नामस्मरणासाठीच केला .

"ज्याला भंग नाही तो अभंग" आणि अशा अभंगातून समाजकार्य, प्रबोधन, जीवन जगण्याचे अनेक पैलू तुकोबारायांनी सांगितले आहेत. तुकोबाराय एका अभंगात ‘मानसशास्त्र आणि व्यक्तीमत्व’ यांचा संगम किती सहज आणि सोप्या भाषेत मांडताना दिसतात... ते म्हणतात की,

**दर्पणसाठी बुझे । नकटे तोंड लपवी लाजे ।**

**गुण ज्याचे जो अंतरी । तोचि त्यासि पिडा करी ।**

**चोरा रूचे निशी। देखोनिया विटे शशी ।**

**तुका म्हणे जन ऐसा देह भाग्य हिन ॥**



माणूस हा जेव्हा स्वतःला आरशात बघतो तेव्हा तो स्वतःला न्याहळत राहतो आणि स्वतःला न्याहाळत असताना आपल्याला वाटत की माझा रंग अजून थोडा रंग गोरा हवा होता, नाक थोडंसं लांब पाहिजे होत..! चेहरा जरा जास्तच गोल आहे, असे ना ना तऱ्हेनं आपण आपल्याबद्दल बोलत असतो. परंतु मला जस रूप रंग परमेश्वराने दिला तसा मी सुंदर आहे किंवा मी आहे त्यात समाधानी आहे मी जसा आहे तसा समोरच्या व्यक्ती ला दिसलो पाहिजे असं आपलं मत पाहिजे परंतु असं होत नाही चार लोकांच्या समूहात गेल्यावर आपण तोंड लपवतो, दुसरी कडेच कुठे तरी पाहतो, आत्मविश्वास हा स्वतःच कमी करू घेतो. आपण अजून सुंदर हवे होतो किंवा मला समोरच्यासारखं राहता येत नाही, बोलता येत नाही, मला जमतच नाही..! मी करूच शकत नाही..! अश्या प्रकारे आपण स्वतःलाच नावे ठेवतो, कोसतो पण स्वतःला नावे ठेवणं, कमी समजणे हा ही एक प्रकारचा दुर्गुणच आहे असं तुकाराम महाराज आपल्याला सांगतात... ते म्हणतात की स्वतःला आणि समोरच्या व्यक्तीला कमी समजणे किंवा नावे ठेवण हा एक दुर्गुण आहे. आपल्याला जे दिले आहे ते स्वीकारा. मला येवढं कमी, त्याला इतकं जास्त. 'माझा- मी' हा दुराग्रह या मध्ये आहे. जे गुण दुर्गुण आहेत ते स्विकारा, "स्वतः ला स्वीकारा".



मी आहे तसा छान आहे हे स्वतःला सांगितलं की आपण आपला स्वीकार करतो आणि आपण आपला स्वीकार केला की जगणं सोप होत, नाहीतर ही गोष्ट सतत त्रास देते. आत्मबल नष्ट करते. मन अधिक चंचल होत आणि मग माणुस संतुष्ट होण्याचे मार्ग शोधायला निघतो हे नेहमीच तुकोबाराय सांगतात. मनाचं एक उदाहरण देताना ते म्हणतात की,

पौर्णिमेचा चंद्र इतका सुंदर असतो

परंतु त्या चंद्राचा राग हा चोरांना येतो कारण त्यांना चोरी करायची असून त्यांना त्यासाठी अंधार हवा असतो. येवढा सुंदर चंद्र, त्याच इतकं लोभस रूप असतं परंतु त्याचा आनंद त्यांना घेता येत नाही कारण त्यांच्या मनामधे किल्मिष आहे, त्याचा मनात खोट आहे, मनात सैतान आहे आणि यामुळे त्याचा आनंद ते घेऊ शकत नाही. प्रत्येक गोष्टीत, परिस्थितीत जो आनंद शोधु शकत नाही त्याचा तो देह, त्याचा जन्म हा हिन असुन त्याचा काहीही उपयोग नाही म्हणून आहे ती परिस्थिती स्वीकारावी आणि आनंदी रहाव हा सुंदर उपदेश जगद्गुरू तुकोबाराय सांगताना दिसतात.




तुकोबाराय नेहमीच थोड्या शब्दात फार काही सांगुन जातात, त्यांचा प्रत्येक अभंग त्याचा अर्थ हा आकाशाएवढा असुन त्याचे अर्थ काढावे, आणि विश्लेषण करावे तेवढे कमीच ! तुकोबाराय काल आज आणि उद्याही सर्वांना प्रेरणादायी असणार आहेत. त्यांच्या एका अभंगाचा अर्थ लावून विश्लेषण करण्याचा प्रयत्न मी इथे केला आपणही या अभंगाचा अर्थ आपल्या जीवनाप्रमाणे लावा आणि त्यातील गुण आत्मसात करुन आपले जीवन सुखकर बनवा....

**- सुप्रिया जाधव**

# आठवण...

आठवण तुझी येता, तिला मनाशी ठेवतो
झोप डोळयात येता, फोटो उशाशी ठेवतो..

तरंग उठतो प्रितीचा मनाच्या काठावर
रंग गुलाबी नजरेचे असे मी तळाशी ठेवतो..

वर वर येतो गंध मग काळजाला सुगंधी
अत्तर जेंव्हा मी वेदनेच्या मुळाशी ठेवतो..

वाहून काय नेईल वाट संकटाची मला
मी सहवास माझा सागराशी ठेवतो..


हरलो जरी तरी मन खचले ना कधी
मी स्पर्धा माझी इथे स्वत:शी ठेवतो..

विचारांनी निचतेची खोली गाठली त्यांच्या
संवाद माझे मी आता नभाशी ठेवतो..

- शैलेश. भा. राउत.

## इंटरनेट आणि

# सोशल मिडीया



सोशल मीडिया व अन्य समाजमाध्यमांचा उपयोग व दुरुपयोगावर जगभरात वादविवाद सुरू आहेत. प्रत्येकाला येणारे स्वानुभवावरून प्रत्येक जण आपली विचारसरणी ठरवतो. सोशल मीडियाचा उपयोग प्रत्येकासाठी वेगवेगळा आहे. प्रत्येकासाठी त्याचे फायदे आणि तोटे वेगळे आहे यामुळे याबद्दल एक ठराविक दृष्टिकोन निर्माण करणे अवघड जाते. पण पण प्रत्येक नाण्याला जशा दोन बाजू असतात तसेच सोशल मीडिया आणि समाज माध्यमांना ही आहेत आणि त्याचे दूरगामी परिणाम समाजावर आणि समाजाच्या प्रत्येक घटकावर होतात.

समाज माध्यमातील सर्वात महत्त्वाचा घटक कोण असेल तर तो एक व्यक्ती असतो. व्यक्तीच्या विचारांवर, गरजेवर व निर्णयावर समाज माध्यमांचा किती उपयोग होईल हे ठरते. समाज माध्यमांचा सर्वात मोठा उपयोग जर आजच्या काळात कोणता असेल तर तो म्हणजे आजचे संवादाचे माध्यम बदलले आहे. प्रत्येकाला आपल्या हक्काची ठराविक अशी जागा समाज माध्यमांनी उपलब्ध करून दिली आहे. आजच्या काळातील नवीन धोरणे, विविध प्रकारचे अद्ययावत तंत्रज्ञान व विविध प्रकारचे खाजगी व आंतरराष्ट्रीय उद्योग यांच्या वाढीमध्ये समाज माध्यमांचा खूप मोठा सहभाग आहे.

आजच्या काळात इंटरनेटची स्वस्त उपलब्धी मूळे खाजगी तसेच सरकारी कामांमध्ये तांत्रिक मार्गांचा वापर खूप वाढला आहे. शाळा-महाविद्यालयांपासून ते सरकारी व निमसरकारी क्षेत्रांमध्ये सुद्धा इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे त्यामुळे खाजगी तसेच सरकारी उपक्रम जे समाजातील घटकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत त्यांचा उपयोग आपल्याला इंटरनेटच्या माध्यमाद्वारे करता येतोय. आता सरकारी कामांचा तोच कंटाळवाणा व किळसवाणा चेहरा बदलून अद्ययावत व आधुनिक चेहरा दिसून येतोय.




आजच्या या चाकोरीबद्ध समाजाचे कायदे बदलण्याचं काम सुद्धा समाजमाध्यम व इंटरनेट नी केलयं. अगोदरच्या काळात नोकरी म्हटले की खूश होणाऱ्या समाजाला हळू हळू या गोष्टींतील फोलपणा दिसून आला. आपल्या कलागुणांचा व कल्पकतेचा वापर करत आपली उपजीविका भरण्याची संधी समाज माध्यमांनी दिली आहे. Youtube आणि Tiktok सारख्या माध्यमांचा उपयोग करून

उपजिवीका आपण भरू शकतो. कल्पकता व उद्योजकतेला यामूळे प्रोत्साहन मिळते. कलाक्षेत्राला सुद्धा या माध्यमांमुळे एक वेगळा चेहरा मिळाला आहे. Netflix किंवा Amazon prime सारख्या माध्यमांनी पारंपारिक चित्रपट व्यवस्थेला आत्मनिरीक्षण करायला भाग पाडले आहे. आजच्या या 21 व्या शतकातील समाजमाध्यमांनी आपल्यावर पाडलेला प्रभाव नाकारण्यासारखा नाही. आजच्या काळात परिवर्तन घडवून आणायला किंवा क्रांती घडवून आणायला म्हणून समाजमाध्यमांचा उपयोग प्रभावी पणे होऊ शकतो.



पण, नाण्याच्या एका बाजूने पूर्ण नाणे अस्तित्वात येत नाही. त्यासाठी दोन्ही बाजूंचा विचार करावा लागतो. एखाद्या गोष्टीच्या सकारात्मक बाजू दाखवल्या म्हणजे त्याच्या नकारात्मक बाजूकडे दुर्लक्ष करावे असे नाही. उलट सामाजिक माध्यमांचा सकारात्मक पेक्षा नकारात्मक उपयोग जास्त आढळून येतोय. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट' ही बाब समाज माध्यमांच्या उपयोगाला पूर्णपणे लागू होते. व्यसनाचे वेगवेगळे प्रकार असतात आणी समाजमाध्यमांचे व्यसन हा आजच्या पिढीतील व्यसनाचा नवीन प्रकार आढळून येतोय. समाज माध्यमांचा प्रत्येक अंगाने दुष्परिणाम मानवी जिवनात आढळून येतोय. मानवाच्या मानसिकतेवर घातक परिणाम या समाज माध्यमांचा होतो. समाज माध्यमांच्या अतिवापरामुळे शारीरिक हालचाल मंदावली असल्यामुळे शारिरीक आजारांना आमंत्रण मिळत आहे. विचार करण्याची, नवनवीन गोष्टी बनवण्याची,जिज्ञासेची तसेच कल्पकतेची सवय तरूणांमधून हरवत चालली आहे. नातेवाईक,मित्रमंडळी तसेच समाजातील आपल्या संबंधांवर अनिष्ठ परिणाम दिसून येत आहेत.

'सोशल मिडिया' हि ठरावीक धोरणांवर आधारित एक व्यवस्था आहे. दुर्दैवाने प्रत्येकाला ही व्यवस्था समजलेली नाही. ही व्यवस्था समजण्यासाठी विदाविज्ञानाची माहिती असणे गरजेचे असते.आपली समाज माध्यमांवर असणारी विदा आपली ठराविक प्रतिमा दाखवते. ही विदा आपल्या आवडी किंवा नावडी वर आधारीत असल्यामूळे याचा उपयोग सत्तेसाठी करण्यात येतोय. उदा;

डोनाल्ड ट्रम्प यांनी याच विदेचा उपयोग करीत रशियन व्यवस्थेच्या मदतीने आपली सत्ता अमेरिकेत आणली. आपली विदा किती जास्त महत्त्वाची आहे हे दिसून येते. DARK WEB सारख्या गोष्टी(ज्यामध्ये मानवी तस्करी,अश्लिल चित्रफिंतीचे महाजाळे,अमली पदार्थांची विक्री इ.) सुद्धा या माध्यमांवर आहेत आणी याचा भयंकर परिणाम होतोय.

तरूण पिंढीना भ्रामकतेमध्ये अडकवून ठेवण्यात समाज माध्यमांचा खूप मोठा हात आहे. आपले महत्वाचे निर्णय घ्यायचे सोडून तरुण पिढी दिवसभर नेटवर पडून राहत आहे. भविष्याचा विचार करण्यापेक्षा दररोज मिळणारे इंटरनेट कसे संपवता येईल याचाच विचार तरुण पिढी करताना दिसते.

समाज माध्यमांचा सर्वात मोठा दुष्परिणाम जर कोणता असेल तर तो हा आहे की हे माध्यम आपल्याला एका भ्रामक जगात अडकवत जाते. Like आणी Dislike वर चालणाऱ्या या जगात मूले एक एका Like साठी हपापलेली दिसतात. या भ्रामक जगाचा दुष्परिणाम त्यांच्या मानसिकतेवर होताना दिसत आहे. मुले मानसिक आजारांना बळी पडत आहेत. काही काळापूर्वी झालेल्या एका निरीक्षणावरून एक निष्कर्ष निघाला की जास्तीत जास्त सोशल मिडीयाला धरून बसणाऱ्या मूलांमध्ये मानसिक आजार तीव्र प्रमाणात दिसून येत आहेत. PUBG सारख्या शुल्लक खेळासाठी मूल आपल्या पालकांच्या जिवावर बेतताना दिसत आहेत.



समाज माध्यमे ही हितकारक की अहितकारक हे पूर्णपणे आपल्याच उपयोगावर अवलंबून आहे. स्वातंत्र्यासोबत जबाबदारीसुद्धा आपल्यावर येत असते त्यामुळे कोणतीही गोष्ट जबाबदारीचे भान ठेवून केल्यावर त्याचा फायदा आपल्याला दिसून येतो. समाज माध्यमांच्या वापराच्या स्वातंत्र्यासोबत त्याचा जबाबदारीने वापर करणे सुद्धा अपेक्षित आहे त्यामुळे समाज माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे म्हणजेच समाज माध्यमांचा योग्य वापर करणे होईल.

**- राजीव पवार.**

आता

# विश्वास राहिला नाही

अजूनही जमत नाही त्यांना दूर्बलांचा आधार व्हायला

अजूनही जमलं नाही त्यांना संविधान समजून घ्यायला

आणि जमणारही नाही वाटतं कधी सत्याची बाजू घ्यायला

तरीही मुकुट त्यांच्याच डोक्यावर विक्राळ बहुमतासह.....

कोरड्या, भयाण दुष्काळात भोगणाऱ्या शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा

आणि जनावरांचा हंबरडा त्यांना ऐकूच नाही येत कधी

खुंट्यावर तडफडणाऱ्या गायी

आता माता नाही वाटत त्यांना.....



नेमका निवडणूकी आधी दिसू लागतो त्यांना राममंदिराचा कळस

कल्पनेतील रामाला अस्तित्वात आणलयं आणि पोटात ढुसण्या मारणारी भूक

कल्पनाच वाटत आली आहे त्यांना

अगदी आता आतापर्यंत.....

पदव्या आणि बायोडाटा घेऊन भटकणाऱ्या तरुणांचा
देशाच्या बेरोजगारीचा प्रश्नही सोडवता नाही आला, ठोस आश्वासनं देऊनही
त्यांना हवे आहेत युवक झेंड्यांचे दांडे धरायला फक्त......

आता आम्हांला समजून द्यावं लागेल त्यांना आता आम्हालाही समजू लागले आहे म्हणून
आपला आवाज पोचवावाच लागेल कोणत्याही मार्गाने
कारण, निवडणूकीतून लोकशाही येते यावर विश्वास राहिला नाही.....

**- उमेश विष्णुलक्ष्मी इंगळे.**





## ममता सपकाळ

# हळवी गजल

एक उत्कृष्ठ गझलकारिका, एक उत्तम कवयित्री आणी एक हळव्या स्वभावाचं व्यक्तिमत्व. यांच्याबद्दल व्यक्त होताना कित्येक विशेषण कमी पडतील असे साजेस व्यक्तिमत्व अशी ओळख ममता सपकाळ यांची आहे. सिंधुताई सपकाळ म्हणजेच अनाथांची माई अश्या व्यक्तीच्या पोटी जन्म लाभला आणि पुढे दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथून त्यांचे शिक्षण झाले.



साहित्याची आवड मनात निर्माण झाली आणी हळूहळू वाचनासोबत लिखाण करायला चालना मिळत गेली, असंख्य आणि दर्जेदार गझल अन कवितांचा जन्म त्यांच्या लेखणीतून झाला आहे

**आता त्यांचेच काही शेर बघा......**

**पान पान तो लुटून गेला**

**मी दसऱ्याचे पान झाले.**

**हवे हवे ते मिळो एकदा**


**नको नको जर चिकार मिळते.**

**काही ना उरले माझे,**

**ना उरले त्याचे काही**

**आता यावर हळहळणे पण उपयोगाचे नाही.**

पहिल्या शेरातून अत्यंत सहजपणे प्रेमळ शब्दात प्रेम व्यक्त केलं आहे. तर दुसऱ्याच शेरात आयुष्यात नको नको ते न मागता मिळते पण आपल्याला हवे ते मिळवायचे असल्यास आणी ते मिळवण्यासाठी फार अडचणींना तोंड द्यावे लागते अन हा संघर्ष कधी कधी फार मोठा असतो हीच भावना दुसऱ्या शेरातून व्यक्त होते .पुढे बघायचे झाल्यास तिसऱ्या शेरात विरहाची भावना त्यांनी अत्यंत मार्मिक आणी मनाला भिडेल अश्याच शब्दांत व्यक्त केली आहे.



अश्या अनेक शेरामधून ममता सपकाळ जगण मांडत असतात.त्यांचे लिखाण वाचताना किंवा टीसनचयस गझला ऐकतांना हे सारे काही आपल्याच आजूबाजूला किंवा आपल्याच जीवनाशी निगडीत आहे असे वाटते.शेवटी लिखाणात वास्तवता असणे फार गरजेचे आहे आणी ही वास्तवता आणी ती दाहकता मला ममताई यांच्या लेखात, गझलेत अन कवितेत ही दिसून येते.

**यानंतर च्या दोन गझला वाचुन तुम्हाला त्यांचा प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा हेतू किती स्पष्ट आहे हे कळेलच**

## १

हवाहवासा.. म्हणजे तू
एक दिलासा..म्हणजे तू

मागत असते मनात मी
जरा जरासा..म्हणजे तू

आजवरी ना केला जो
तोच खुलासा..म्हणजे तू

जाळे मी केले माझे
जळात मासा..म्हणजे तू

खेचत नेते तिच्याकडे
ती जिज्ञासा..म्हणजे तू

पाय निघेना का माझा
जणू लवासा..म्हणजे तू

## २

फक्त आभास आहेस तू
हो..जवळपास आहेस तू

चारचौघाप्रमाणेच मी
केवढा खास आहेस तू

एकतारी लयीसारखा
श्वास निश्वास आहेस तू

भेट होते सणासारखी
गोड सहवास आहेस तू

कोणतीही असेना मिती
तू असावास..आहेस तू

- शैलेश. भा. राउत.

# कवि लिहू लागतो तेव्हा...

लोक म्हणती शस्त्र भयानक वार त्याचा खोलवरी,
शस्त्र ही मग बोथट होई कवी लिहू लागतो तेंव्हा.......

शस्त्रापेक्षा कलम भारी राज्य करी जगावरी,
कलमचं मग हाती येते कवी लिहू लागतो तेंव्हा.......

लोकशाहीचे तत्व खरे सुजाण नागरिक निर्माण करें,
व्यक्तीही मग सक्षम होई कवी लिहू लागतो तेंव्हा.......

नष्ट करुनी धर्म - जातीला करुनी विरोध तलवार - पातीला,
अस्पृश्यताच मग नष्ट होई कवी लिहू लागतो तेव्हा.......

कवी आता लिहीतो आहे दुख देशाचे मांडतो आहे,
देश ही मग प्रगतच होई कवी लिहू लागतो तेव्हा.......

**- उमेश विष्णुलक्ष्मी इंगळे.**

# आमचे तरुण

**आ**पला भारत तरुणांचा देश आहे असं म्हटलं जातं, आणि तरुणंच देशाच्या जडणघडणीमधे मोठी भुमिका निभावत असतात. देशाचा पाया जरी पुर्वी रचलेला असला तरी त्या पायावर चांगली वास्तु उभारण्याची जबाबदारी आजच्या सुशिक्षीत आणि साक्षर तरुणांचीच आहे. ग्लोबलायझेशन च्या युगात जगातील देश एकमेकांशी जोडले गेले आणि एकमेकांशी स्पर्धा करत स्वतःला वरचढ सिद्ध करण्याच्या तयारीत आहेत. जग जोडले जात आहे, एकमेकाच्या सहाय्याने विविध देशांतील तरूण मोठमोठे उद्योग उभारत आहेत, देशाला नवी दिशा देत आहेत पण हे सर्व परदेशात होत असतांना आपल्या भारतातील आणि विशेषतः आपल्या महाराष्ट्रातील बहुतांश सामान्य तरूण काय करतोय ? तो या स्पर्धेत का दिसत नाही ? एक सामान्य म्हणुन आपण फार काही करु शकत नाही, आपल्याला मर्यादा आहेत मान्य, पण म्हणुन आपण काहीच करु नये ? आपण आज 21 व्या शतकात जगत असतांना आपल्या समाज आणि देशाप्रतीच्या असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये आपल्याला कुणी सांगाव्या लागतील याइतके आपण सुशिक्षीत नाही ? की आपल्याला सुशिक्षीत बनायचे नाहीए ? देशाप्रतीच्या असलेल्या जबाबदार्या आणि कर्तव्ये बाजुला ठेउ तो विषय मोठा आहे पण आपल्याला आपला स्वतःचा स्वार्थ आणि फायदा ही कळत नाहि ? कि आपण सर्वांनी डोळ्यावर पट्टी बांधलीये ? आपण फक्त 'शिक्षीत' होत चाललोय, 'सुशिक्षीत' कधी होणार ? मी ही एक तरुण आहे आणि मी आमच्या तरुणांना अत्यंत जवळून पहातोय, वाट भरकटलेल्या प्रवाशांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतांना मला दिसतंय. काही वाट भरकटलेत, काही भरकटण्याच्या मार्गावर आहेत तर काही स्वतः व्यवस्थित राहुन दुसऱ्याला भरकटवण्याच्या मार्गावर अगदी आपल्या राजकीय नेत्यांसारखे ! डोळे असून आंधळयांचे, झोपेचे सोंग घेतलेल्यांचे प्रमाण ही काही टक्के यात आहे.

गुळगुळीत गोष्ट माणसाला लवकर पटते आणि पचतेही पण प्रत्येक वेळी ते सत्यच असेल असे नाही ! आणि हेच मला पहिल्या मुद्द्यात येथे मांडायचंय. आज आपण सत्य सांगण्यापेक्षाही समोरच्याला बरं वाटेल ते सांगत असतो आणि आज तरुणांना आपल्या पालकांना तसेच ओळखीच्या व्यक्तीला मी फार काही करतोय हे पटवून देण्याचा एक मार्ग सापडलाय आणि तो म्हणजे MPSC/ UPSC ! सर्वांच्या बाबतीत असंच आहे असं मी अजिबात म्हणत नाही. पण या गोष्टी माझ्या आजुबाजुला मी माझ्या डोळ्यानी पाहिल्याय, पहातोय म्हणून लिहीतोय. मी हे ही पाहिलंय की या कॅटेगरीतील मुलं आपण काय शिकत आहात असं विचारल्यास डिग्री बद्दल सांगायचं सोडुन 'MPSC\ UPSC ची तयारी करतोय' असं सांगुन मोकळे होतात, बाकी कशाला नंबर लागला नाही की MPSC चा क्लास लावून मोकळं व्हायचं आणि आपल्या पालकांना आणि स्वतःला हि समाधानी करुन घ्यायचं ! पण हे स्वतःला समाधानी करत आहेत की अप्रत्यक्षरीत्या फसवत आहेत ? हि त्यांची पळवाट आहे का ? की ते सोपा मार्ग शोधताय ? पण हा मार्ग तर सोपाही नाहिये ! खरं तर हे आहे की नियोजनंच चुकलंय आपलं, सुरुवातीपासुन फक्त एकच मार्ग ठेऊन आपण चाललो आणि त्याला नंबर लागला नाही तर आपल्याकडे दुसरा मार्गच उरला नाही. दोस्तहो म्हणून यातून शिकण्यासारखं महत्वाचं एक की 'आपल्याकडे मार्ग नसणे हे दुबळेपणाचे लक्षण आहे, म्हणून एकाहुन अधिक मार्ग ठेवा'.

'आमचा तरुण चमचा आहे' असं जर तुम्हाला सांगितलं तर कसं वाटेल ? हे ऐकायला नक्कीच चांगलं वाटणार नाही किंवा वाटेल की याचा कसा संबंध ? पण संबंध आहे.
लेखक श्री. अरविंद जगताप यांनी एका ठिकाणी हे मांडलं होतं, मला ते फार आवडलं म्हणुन येथे लिहितोय. आपण एका वाटीत गुलाबजाम खायला घेतला की त्याचा वाटीपासून ते आपल्या तोंडापर्यंतचा प्रवास सुकर करण्यासाठी आपण वापर करतो तो चमच्याचा, शेवटपर्यंत या चमच्याच्या नशीबी फक्त 'खरकटं' राहाणं एवढच असतं आणि या चमच्याप्रमाणे वापर होतोय आज आमच्या 'तरुणांचा'. कुणाला तरी व्यवस्थितरित्या घास भरऊन देण्याचं काम आमचे तरुण कुणाकुणाचे झेंडे खांद्यावर घेउन करताय. त्यांचा



वापर फक्त गरजेपुरता आणि त्यापेक्षाही फक्त स्वार्थापुरता होतोय हे त्यांना कळतं पण वेळ हातुन निघून गेल्यावर ! मग हाती पश्चातापाव्यतिरीक्त काही राहात नाही. ज्या काळात स्वतःचा अभ्यास करुण भविष्याच्या वाटा निवडायच्या असतात त्या काळात

आम्ही तरुण अशी ‘चमचेगिरी’ करतो आणि हे योग्यच नाही. म्हणुन दोस्तहो ‘कुणाचे चमचे बनू नका, चमच्याचा वापर फक्त गरजेपुरताच केला जातो’.

आपली ओळख कळाली पाहीजे, आणि ती ही वेळेत. मला एकदा खांद्यावर हात टाकत एक जण म्हणाला की ‘तू छान कार्यकर्ता आहेस’ त्यावेळी प्रथमतः तर हे कळाले आपण चुकीच्या ठिकाणी उभे आहोत आणि त्यांना मी नम्रपणे म्हणालो ‘दादा, मी कार्यकर्ता वगैरे नाही फक्त अभ्यासक आहे’. मला त्याठीकाणी माझी ओळख ठाऊक होती अशीच जर आपल्याला आपली ओळख ठाऊक असेल तर तुमचा मार्ग नक्कीच तटस्थ राहून तुम्ही योग्यरित्या त्यावर चालु शकता. उगाच कुठेही आपण आपली ओळख अथवा क्षमता विसरुन ‘घालीन लोटांगण वंदिन चरण’ करु नये. डार्वीन ने एक सिद्धांत सांगितलाय की ‘Only Strongest can Survive’ आणि त्याचप्रमाणे तुम्ही जर ‘Dominant’ न रहाता गरज नसतांना आणि चुकीच्या ठिकाणी ‘Recessive’ झालात तर तुमचा एक चांगला ‘कार्यकर्ता’ झाल्याशिवाय राहणार नाही.

सांगायला खंत वाटते पण ‘दोघात शंभर’ चं मिळुन पेट्रोल टाकुन साहेबाच्या मागे जाणाऱ्या तरुणांची संख्या आज वाढतांना दिसतीये. कुण्या साहेबानी खांद्यावर हात टाकला आणि काय चाललय ? अशी ‘कोरडी विचारपुस’ जरी केली तरी आज आम्हाला ‘दादा’ झाल्यासारखं वाटायला लागलंय ! इकडे परीक्षेत विषय बॅक पण रस्त्यानी जातांना चार लोकांनी हात केला की आमची छाती अभिमानाने फुगते कीती खेदजनक आहे हे. आम्ही सुधरलं पाहिजे, आम्ही सुधरवलं पाहिजे.

कुठल्याही गोष्टिचा अतिरेक वाईटच असतो, एखाद्या गोष्टिची ‘सवय’ पुढे ‘व्यसन’ बनते आणि व्यसन हद्दिबाहेर गेले की ते व्यसन तुमच्या मानगुटीवर बसुन तुम्हाला चालवते. व्यसन हे फक्त सेवन केल्या जाणार्या गोष्टींचे असते असे नाही काही व्यसन हे तुमच्या बुद्धीला सुद्धा होउ शकतात आणि त्यातील एक व्यसन आहे ‘कट्टरतावाद’. कट्टरतावाद हे व्यसन आहे असेच मी म्हणेन. कट्टरतावाद मग तो कुठल्याही बाजूचा असो तो घातकंच. इतिहास अभ्यासक ज्यावेळी इतिहास मांडतो त्यावेळी जर त्याने तो कुठल्या एका विचाराच्या बाजूने मांडला तर तो इतिहास विकृत असतो आणि असे आपल्याकडे यापुर्वीहि झालेले आहे म्हणुन आजही शिवछत्रपतींचा इतिहास अभ्यासतांना भारतीय इतिहासकारांपेक्षा बाहेर देशातील अभ्यासकांवर जास्त विश्वास ठेवावा लागतो, कुठल्याही बाबतीत अशी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आजच्या तरुणाने कुठल्याही घटनेकडे तटस्थपणे पहाणे अत्यंत गरजेचे आहे, एखाद्या ठराविक विचाराचा चष्मा परिधान केल्यास समोरचा पुर्णपणे चुकीचाच वाटु लागतो आणि तसे होणे योग्य नाही. **‘जुलुमशाही जशी मनावर बिंबवण्यातून वाढते’** आणि **‘एखादी खोटी गोष्ट जशी पुन्हा पुन्हा दाखवल्यास खरी वाटु लागते’** तसेच कट्टरतावादाचे आहे असे मला वाटते. आज

आमचे तरुण विचार न करता कट्टरतावादाकडे वळत चालले असल्याचे चित्र दिसत आहे आणि याचे परिणाम वाईट होताना दिसत आहेत एक छोटेसे उदाहरण द्यायचे झाले तर प्रथम वर्षाला एम. पी. एस. सी. करावी म्हणुन कौलेज मधे एडमीशन घेतलेला मुलगा अगदी सहा महिन्यातच एका कट्टरतावादाशी निगडीत संस्थेच्या नादाला लागतो आणि पुढील वार्षिक परिक्षेचा वेळी अभ्यास करायचा सोडुन हा मुलगा त्या संस्थेच्या कामाला गेलेला असतो ! हे अगदीच वाईट आहे. तात्पुरत्या चांगल्या वाटणाऱ्या त्या गोष्टी आपलं भविष्य पलटउ शकतात हे जर वेळीच कळाले तर फार बरं होइल... आपल्याकडे तशी व्यसनांची कमी नाही आणि व्यसन जडवून घेणाऱ्यांचीही कमी नाही. व्यसन जडायची कारणे वेगवेगळी असु शकतात. यात खंतेची बाब हि आहे की तरुण वर्गही यात वाहवत चाललाय. 11-12 वी च्या चांगल्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचाही यात समावेश आहेच हे ऐकायला वेगळं वाटेल पण सत्यच आहे. यात मुलांना मोठेपणा वाटायला लागलाय ! ‘शिक्षित’ आणि ‘चांगल्या’ घरातील मुला-मुलींचाही यात समावेश आहे. थोडक्यात सांगायचं झालं तर ‘ज्या गोष्टीची लाज वाटायला पाहिजे त्या गोष्टीचा माज वाटतोय’. कुठल्या गोष्टीची ‘लाज’ वाटावी आणि कशाचा ‘माज’ हे समजण्याइतपत तरी आपण ‘सुशिक्षित’ व्हायला हवं. बरं हे मी बोलत होतो आम्ल पदार्थांच्या असलेल्या व्यसनाबद्दल



पण फक्त हेच व्यसन आम्हाला जडलेलं नाही तर अजुन एक मोठं भयानक व्यसन आहे आणि ते म्हणजे ‘सोशल मिडीया’ ! **‘गरजेचं ते आणि सोसल तेवढं’** घेणं ज्याला जमलं तो याच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन कितीतरी पुढे जाउ शकतो. कलाकार, गायक असेल तर तो त्याची कला जगासमोर मांडु शकेल लोकांपर्यंत पोहचु शकेन आणि हुशार विद्‌यार्थी हे करतही आहेतच त्यात वाद नाही. पण आज काही बेरोजगार तरुण वर्ग असाही आहे जो याच सोशल मिडीयावर आपले स्वतःचे फोटो टाकुन, सध्या ट्रेंडींग वर असलेल्या टिक टाक सारख्या ‘वेळ आणि बुद्धी खाऊ’ सोशल मिडीया वर व्हिडीओ बनवून फक्त लाइक, कमेंट आणि लोकांची सहानुभुती मिळवण्याच्या नादात आपली वाट सोडून आपले दिवस वाया घालवताहेत. मी तर म्हणेन की हे व्यसन आम्ल पदार्थांच्या व्यसनाहुनही

अधिक धोकादायक आहे. हे व्यसन आपल्याला वाचन, पुस्तके आणि अभ्यास यापासुन दुर करत आहे आणि या सर्व गोष्टींमुळे आपण

राष्ट्रीय- अंतरराष्ट्रीय स्पर्धेतुन बाद होत चाललेलो आहोत. आता आपणच ठरवा की या ‘टिक टाक च्या गाण्यांवर आपण नाचायला पाहिजे की पुस्तकं घेउन वाचायला पाहिजे’.

मी काही काळापुर्वी जंगलात भटकायला गेलो तेव्हा मला तिथे विविध रंगांचे किटक आणि छोटे प्राणी दिसले, काही अत्यंत ‘भडक रंगाचे सुंदर आणि आकर्षक’ होते, मी त्यांच्याकडे आकर्षित झालो पण जेव्हा मी सोबतच्या तज्ञांना त्याबद्दल विचारलं तर त्यांनी सांगितलं की हे अत्यंत ‘विषारी’ आहेत आणि त्यांच्यापासुन आपण दुर राहिलं पाहीजे. आकर्षणावरुनच अजुन एक विचार आला की काही छोटे मासे बराच काळ ज्यावेळी छोट्या ठिकाणी कैद ठेवले जातात आणि त्यानंतर त्यांना समुद्रात वगैरे सोडलं जातं त्यावेळी त्यांना अचानक दुसऱ्या जगात आल्यासारखं वाटतं आणि त्यांना सर्वकाही मोठंमोठं आणि रंगीत वाटू लागतं याच रंगीत वाटणाऱ्या गोष्टी त्यांचा घात करतात ते जोमानी त्या मोठ्या जगात आणि रंगीत गोष्टीकडे जावू लागतात आणि तेवढ्यात एखादा मोठा मासा येउन त्याला खाऊन टाकतो आणि याची स्पर्धा येथेच संपते, पण यानी जर धिराने काम केलं असतं तर कदाचीत हा येथे टिकू शकला असता हा सर्व ज्यावेळी मी विचार करत होतो तेव्हा डोक्यात अचानक आलं की आपल्याला उत्तर सापडलं. पण कशाच ? तर आमचे मुलं कुठं चुकतात याचं. ज्यावेळी आपण एखाद्या वेग़ळ्या परिसरात जातो तेव्हा तेथिल ‘भडक आणि रंगीत’ गोष्टी आपल्याला आकर्षित करतात आपण त्यांच्याकडे आकर्षिले जातो आणि तिथे आपण चुकतो. हा ‘चकवा’ आहे, प्रत्येकाला पडतो पण वेळीच सावरलं तर भटकण्यापासुन आपण वाचु शकतो. जशा निसर्गाने या गोष्टी शिकवल्या तशा बऱ्याच गोष्टी हा निसर्ग शिकवत असतो तुम्ही फक्त शिकायला पाहिजे, अनुभवायला पाहिजे, वाचायला पाहिजे आणि लिहायला पाहिजे.



आपल्याबद्दलच्या चांगल्या गोष्टी आपल्याला फार लोक सांगतील पण आपलं सत्य हे आपणंच समजायला आणि स्विकारायला हवं, म्हणुन हा लिखाणाचा प्रपंच.

**‘गुळगुळीत छान वाटणारं, पचणारं असत्य सांगण्यापेक्षा परखड आणि न पटणारं, मनाला बोचणारं सत्य सांगायला आपण दचकु नये, घाबरु नये आणि जर आपण ते सांगण्यास घाबरत असू तर आपण 21 व्या शतकातील तरुण म्हणुन घेण्याच्या लायकीचे नाहीओत असंच मी ठामपणे म्हणेन’.**

**- आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**

# आमच्याबद्दल...

**'शिवस्फूर्ती वाचन कट्टा'**

हा औरंगाबाद शहरात स्थित तरुणांनी तरुणांसाठी चालवलेला उपक्रम आहे. ‘एकमेका पुस्तके देवू । अवघे होवु बुद्धिवंत’  या विचाराने सर्व वाचक, वैचारिक तरुण एकत्र येऊन विविध पुस्तके तसेच विविध ज्वलंत विषयांवर चर्चा होऊन हा कट्टा दर महिन्याला पार पडत असतो. अधिकाधिक तरुणांना वाचनाकडे आकर्षित करून ‘आपल्या धडावर आपलेच डोके असावे’ यासाठी तयार करणे हाच या वाचन कट्ट्यामागाचा उद्देश आहे.

आमच्याशी जोडुन घ्या...

**Website**

https://shivsphurtivachankatta.blogspot.com/

**Facebook Page**

https://www.facebook.com/adminVachanKatta/

**Instagram**

https://www.instagram.com/shivsphurti_vachan_katta/

**YouTube**

https://www.youtube.com/channel/UChVBI5XyE4UQL90fl6GoSzg

मित्रांनो आता आपणही होऊ शकता

# ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’

चे सभासद !

खाली दिलेल्या लिंक वर जाऊन फॉर्म भरावा.

आपल्याला **‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’** च्या समुहामधे समाविष्ट करुन घेतले जाईल.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfncIGigYGjDQcZjQ96QEV71bgtKVrBQ5DNfqDWQ8xMa6MuQQ/viewform



आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शास्त्रे यत्ने करु ॥१॥
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वांटू धन जनलोका ॥२॥

# तुका म्हणे

पहा शब्दचि हा देव। शब्दचि गौरव पुजा करु ॥३॥



असाध्य ते साध्य करिती सायास। कारण अभ्यास तुका म्हणे ॥

